cmyk

## संपादकीय

### दोन उपमुख्यमंत्र्यांच्या वर्तनातील तफावत नजरेत भरणारीच

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकार १०० दिवसात गतिमान कारभार करून काही वेगळे घडवून दाखवेल असे सांगत आले आहेत. सरकारी अधिकाऱ्यांनी या घोषणेला उचलून धरत आपल्याकडे जे काही चांगले होते त्याचे मार्केटिंग जोर जोराने सुरू केले आहे. या प्रकारात सरकारी अधिकाऱ्यांच्या मनात लपून असलेल्या नेतेपणाला वाव देखील मिळाला आहे. पण, एकाच जिल्ह्यात एक पालकमंत्री आणि दोन संपर्क मंत्री लक्ष देणार असल्याच्या वार्तेने ते देखील वैतागले आहेत.


दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### एसटी महामंडळाचे अध्यक्षपद पुन्हा एकदा प्रताप सरनाईक यांच्याकडे

मुंबईः गेल्या काही वर्षांत एसटी महामंडळाचे अध्यक्षपद हे प्रतिष्ठेचे झाले आहे. या पदी प्रामुख्याने राजकीय नेत्याची नेमणूक केली जाते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही परंपरा बदलत अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी यांची यापदी नियुक्ती केली होती. मात्र, आता सरकारकडून अवघ्या महिन्याभरातच हा निर्णय बदलण्यात आला आहे. आता एसटी महामंडळाचे अध्यक्षपद शिवसेनेचे (शिंदे गट) आमदार आणि परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. गेल्या महिन्यात एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदी संजय सेठी यांची नियुक्ती करण्यात आली होती.


बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–३१५ | रविवार, दि.९ मार्च २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये


# मराठवाड्यासह खानदेशचा गळीत हंगाम संपला

## पाच जिल्ह्यातील १० कारखान्यांनी ऊस गाळप आटोपले

**संभाजीनगर । प्रतिनिधी**

**मराठवाडा व खानदेशातील पाच जिल्ह्यातील २२ साखर कारखान्यांनी यंदाच्या ऊस गाळप हंगामात सहभाग घेतला होता. या कारखान्यांनी ७८ लाख ७८ हजार २८० टन उसाचे गाळप करत सरासरी ७.९१ टक्के साखर उताऱ्याने ६२ लाख ३३ हजार ५४५ क्विंटल साखरेचे उत्पादन केले. दरम्यान गाळप करणाऱ्या कारखान्यांपैकी १० कारखान्याचा ऊस गाळप हंगाम आटोपला आहे.**



मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना व बीड तसेच खानदेशातील नंदुरबार व जळगाव या पाच जिल्ह्यातील २२ साखर कारखान्यांनी यंदाच्या ऊस गाळप हंगामात सहभाग नोंदविला. यामध्ये सहकारी १३ व खासगी ९ कारखान्यांचा समावेश आहे. १३ सहकारी साखर कारखान्यांची दैनिक गाळप क्षमता ४४ हजार १५० तर खासगी ९ कारखान्यांची क्षमता सरासरी ४९ हजार ५०० टन इतकी आहे. तेरा सहकारी साखर कारखान्यांनी ३३ लाख ६५ हजार ३२८ टन उसाचे गाळप करत २६ लाख ३ हजार ८९० क्विंटल साखरेचे उत्पादन केले. या सहकारी साखर कारखान्यांचा सरासरी साखर उतारा ७.७४ टक्के राहिला. नऊ खासगी कारखान्यांनी ४५ लाख पान २ वर

## महिलांवरील हिंसाचार रोखण्यासाठी समाजात मूल्ये रुजविण्याची गरज - मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

**महिलांना प्रतिमहिना केवळ १५०० रुपये देऊन थांबायचे नाही. तर त्याचा योग्य विनियोग करून महिलांनी व्यावसायिक होण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. यासाठी आम्ही प्रयत्न करू, प्रत्येक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचा सन्मान करून कुठल्याही क्षेत्रात महिला मागे राहणार नाहीत, याची काळजी घेतली पाहिजे. स्त्रियांना मान देणे हे आपले कर्तव्य आहे. स्त्री– पुरुष भेद करता कामा नये. येत्या पिढीत स्त्री बाबत सन्मानाची भावना निर्माण करावी लागेल. महिलांवरील हिंसाचार कमी करण्यासाठी समाजात मूल्य रुजवावी लागतील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्यासमवेत राज्यस्तरीय बेटी बचाओ, बेटी पढाओ पान २ वर

## शक्तिपीठमधून सरकारमधील दलाल नेत्यांना ५० हजार कोटी

### राजू शेट्टी यांचा सरकारवर गंभीर आरोप



**सोलापूर । प्रतिनिधी**

शक्तिपीठ महामार्ग तयार करण्यासाठी जास्तीत जास्त ३५ हजार कोटींचा खर्च येऊ शकतो. परंतु ८५ हजार कोटींवर नेला आहे. यातील ५० हजार कोटी महायुती सरकारमधील दलाल नेत्यांसाठी ठेवले जातील. त्यामुळे महामार्ग म्हणजे भ्रष्टाचाराचं कुरण बनले आहे, असा गंभीर आरोप शेट्टी यांनी केला आहे. ते शक्तिपीठ महामार्गविरोधी संघर्ष समितीसोबत आयोजित बैठकीत बोलते होते.


शक्तिपीठ महामार्गाला शेतकरी विरोध करत आहेत. परंतु राज्य सरकार मात्र शक्तिपीठ रेटण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप शेतकरी करत आहेत. यावरून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी सरकारवर गंभीर आरोप केला आहे. यावेळी शेट्टी यांनी १२ मार्च रोजी आयोजित मुंबईच्या आझाद मैदानावरील मोर्चात सहभागी होण्याचे स्पष्ट केले. तसेच मोर्चात कार्यकर्त्यांना घेऊन मोर्चा यशस्वी करू, असा विश्वासही शेट्टी यांनी व्यक्त केला. शेट्टी म्हणाले, रत्नागिरी ते नागपूर पान २ वर

## सतीश भोसले पुरता अडकला; अख्खी कुंडलीच झाली उघड

# हरिण मारणाऱ्या खोक्याला लॉरेन्स बिश्नोईकडून धमकी

## पोलिस, वनविभागाकडून भोसलेच्या घराची झाडाझडती; मोठे घबाड सापडले







**बीड। प्रतिनिधी**

**खोक्या उर्फ सतीश भोसले यांच्या घराची शनिवारी पोलीस आणि वनविभागाच्या पथकाकडून झडती घेण्यात आली, त्याच्या घरात जनावरांचे वाळलेले मांस आणि शिकारीचे साहित्य आढळून आले आहे. खोक्याची अख्खी कुंडलीच उघड झाली असून त्याचे पाय आता आणखी खोलात गेले आहेत.**

तसेच खोक्याला आता डॉन लॉरेन्स बिश्नोईकडून धमकी देण्यात आली आहे. त्यामुळे हे प्रकरण किती गंभीर आहे, हे लक्षात येते.

शनिवारी पोलीस आणि वनविभागाच्या पथकाकडून खोक्या उर्फ सतीश भोसले याच्या घराची झाडाडडती घेण्यात आली. त्याच्या घरामध्ये जनावरांचे सुकलेले मांस आणि शिकारीसाठी वापरण्यात येणारं साहित्य फासे वगेरे सापडले आहेत. दरम्यान या प्रकरणात आता मोठी बातमी समोर आली आहे. खोक्याला लॉरेन्स बिश्नोईच्या नावाचा वापर करून पान २ वर

### आज शिरूर बंदची हाक; धसांच्या विरोधात रोष

खोक्या उर्फ सतीश भोसले याचे एक एक कारनामे आता बाहेर येत आहेत. तो फरार झाला आहे. शिरूर तालुक्यातील बावी गावचे रहिवासी असलेल्या बाप–लेकाला बेदम मारहाण, सिंदखेडराजा येथील गरीब व्यक्तीला अमानुष मारहाण, शाळकरी मुलांना धमकी, नोटांचे बंडल उधळणे यासह इतर कारणामुळे खोक्या सध्या पोलिसांच्या टार्गेटवर आहे. तो फरार असून त्याला अटक करण्याच्या मागणीसाठी रविवारी शिरुर बंदची हाक देण्यात आली आहे. खोक्या अजूनही पोलिसांच्या हाती कसा लागला नाही? असा सवाल येथील ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. दरम्यान खोक्याला आ. सुरेश धस यांचे पाठबळ असल्याचा आरोप होत असल्याने आंदोलन करणाऱ्यांमध्ये धसांच्या विरोधात रोष असल्याचे समजते.

### सुरेश धसांना खोक्या द्यायचा मांस–प्रा. टी.पी. मुंडे

बीडच्या शिरूर येथे वनविभागाकडून पाच ठिकाणी पंचनामा करण्यात आला. खोक्या भाई वर २०० काळविटांच्या शिकारीचा आरोप आहे. लक्झरी गाड्या, महागडे मोबाईल, अंगावर सोने असा थाट खोक्या भाईचा होता. याच सोबत खोक्याला वन्य जीवांची





शिकार करून त्याचे मांस खाण्याची देखील आवड होती. ही बाब समोर आल्यानंतर वनविभागाने शिरूर परिसरात पाच ठिकाणी पंचनामा केला आहे. तर, खोक्या भाई वन्य प्राण्यांची शिकार करून त्याचे मटण सुरेश धस यांना घेऊन जायचा, असा गंभीर आरोप ओबीसी नेते टी.पी मुंडे यांनी केला आहे. याबाबत आपण लवकरच मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन धसांवर कारवाई करण्याची मागणी करणार असल्याचे ते म्हणाले.

### धस मुख्यमंत्री व्हावेत ही खोक्याची इच्छा

**खोक्या** भाईचा आणखी एक व्हीडीओमुळेही चर्चेत आला आहे. या व्हिडीओमध्ये, सुरेश (अण्णा) आता आमदार आहेत. भविष्यात ते मुख्यमंत्री व्हावेत. कोणत्याही पक्षातून व्हा. काही घेणं देणं नाही, आपण अण्णाप्रेमीच राहणार. आज मी भारतीय जनता पक्षाच्या पदावर आहे. तरीही अण्णा उद्या कोणत्याही पक्षात गेले तरी माझा राजीनामा पहिला असणार आणि आपण अण्णासोबत असणार, असे म्हणताना खोक्या भाई दिसत आहे. खोक्याभाई हा माझा कार्यकर्ता आहे असे स्वतः सुरेश धस यांनी सांगितले होते. त्यानंतर आता खोक्याभाई सुरेश अण्णा धस हेच मुख्यमंत्री व्हावेत म्हणून अपेक्षा व्यक्त करत असलेले भाषण व्हायरल झाल्याने याची चर्चा होऊ लागली आहे.

### खोक्याने भाजपलाही लावला चुना

सतीश उर्फ खोक्या भोसलेनी तत्कालीन भाजपचे भटके विमुक्त आघाडीचे प्रदेशाध्यक्ष माजी आमदार नरेंद्र पवार यांना जातीची खोटी माहिती सांगून भाजप भटक्या विमुक्त युवा आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष पद घेतले होते. सतीश भोसले हा आदिवासी समाजाचा कार्यकर्ता आहे, तो अनुसूचित जमातीमध्ये मोडतो, भटकायुक्त प्रवर्ग वेगळा आहे. त्यामुळे त्याला २०२१ सालीच मी त्याची पदावरून हकालपट्टी केली होती, त्यानंतरही तो पक्षविरोधी कारवाई, खंडणी, अपहरण चुकीच्या गोष्टी करत असल्यामुळे त्याचा भाजप सदस्यात्वाचा राजीनामा देखील घेण्यात आला, अशी माहिती भाजपचे भटके विमुक्त आघाडीचे बीड जिल्हाध्यक्ष डॉक्टर लक्ष्मण जाधव यांनी दिली आहे.

### धमकीमध्ये नेमकं काय म्हटले?

लॉरेन्स बिश्नोईच्या नावाचा वापर करून सतीश भोसले याला धमकी देण्यात आली आहे. बिश्नोईच्या नावाने अज्ञात व्यक्तीकडून दोन दिवसांपूर्वी एक फेसबुक अकाउंट तयार करण्यात आले. या फेसबुक अकाउंटवरून खोक्या उर्फ सतीश भोसले याला धमकी देण्यात आली आहे. खोक्याला लवकरात लवकर जेलमध्ये टाका अशी मागणी या अकाउंटवरून करण्यात आली आहे. हरिण आमचे दैवत आहे, त्यामुळे खोक्या माफीच्या लायकीचा नाही, असं या फेसबुक पोस्टमध्ये म्हटले आहे.

### खोक्याच्या घरात काय सापडलं?

पोलीस आणि वनविभागाकडून आज खोक्याच्या घराची झाडाझडती घेण्यात आली, समोर आलेल्या माहितीनुसार खोक्याच्या घरामध्ये पोलिसांना वाळलेलं जनावरांचं मांस आणि शिकारीसाठी लागणारं साहित्य आढळून आलं आहे. हे सर्व साहित्य जप्त करण्यात आलं. दरम्यान शिरुर तालुक्यातील नागरिक आता चांगलेच आक्रमक झाले असून, उद्या शिरूर बंदची हाक देण्यात आली आहे.

### फॉरेन्सिक लॅबला पाठवले अवशेष

ऐशोआरामी आयुष्य जगण्यासोबत खाण्यापिण्याची आवड असलेला खोक्या भाई वन्यजीवांची शिकार करत होता. तो वास्तव्यास असलेल्या परिसरात वनविभागाला वन्य जीवांचे अवशेष आढळून आलेत. वनविभाग पंचनामा करत असून वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी वन्यजीवांचे अवशेष जप्त केले असून हाडं प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवली आहेत, अशी माहिती वन विभागाचे वनपाल अधिकार ए. एम. देवगुडेंनी दिली आहे.

## परळीचा अवैध कत्तलखाना प्रशासनाकडून सील

**परळी। प्रतिनिधी**

गोरक्षण सेवा संघाच्या तीन गोरक्षकांनी परळी नगर परिषदेसमोर गेल्या सहा दिवसापासून आमरण उपोषण सुरू केले होते. परळीतील अवैध कत्तलखाना उद्ध्वस्त करा, यासह गो हत्या बंदी बाबतच्या सहा मागण्यासाठी हे उपोषण होते. या उपोषणाच्या समर्थनार्थ सकल हिंदू समाज रस्त्यावर उतरला. त्यानंतर नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी आश्वासन देत तात्काळ हा कत्तलखाना सील करण्यात येईल असे सांगितले. यावर तातडीने कारवाई करण्यात आली असून, अखेर बहुचर्चित परळीतील अवैध कत्तलखाना सील करण्यात आला आहे.

परळी शहरात अवैध कत्तलखाना सुरू असून, तो कत्तलखाना उद्ध्वस्त करून टाका अशा प्रकारची मागणी गोरक्षण सेवा समितीने केली होती. परळी नगर परिषदेने परळी शहरात कोणत्याही कत्तलखान्याला अधिकृत परवानगी दिलेली नसल्याची बाब स्पष्ट केलेली होती. तरीही अवैधरीत्या हा कत्तलखाना सुरू असल्याचे दिसत असतानाही प्रशासन हा कत्तलखाना बंद करण्याबाबत कारवाई का करत नाही? असा सवाल गोरक्षकांनी केला होता. त्याचप्रमाणे गोहत्या बंदी कायद्याची कडक अंमलबजावणी करावी अशा प्रकारचीही या गोरक्षण समितीची मागणी होती. या मागण्या घेऊन गेल्या सहा दिवसापासून परळी नगरपरिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले होते. पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.७ मार्च २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहूः १३५.०० क्विंटल | २,५९७ | ३,०५१ | २,७७८ |
| ज्वारी/हायब्रिडः १५०.५० क्विंटल | २,००० | ३,६०० | २,६३७ |
| मका/लोकलः२०.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर :६.५० क्विंटल | ७,१०० | ७,२०० | ७,१५० |
| उडीद : ७.५० क्विंटल | ५,१०० | ५,१०० | ५,१०० |
| बाजरीः २७.०० क्विंटल | २,०१० | ३,०५१ | २,७१२ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीनः ५७.०० क्विंटल | ३,९८० | ४,००१ | ३,९९३ |
| हरभराः २४.५० क्विंटल | ५,१०० | ५,२०० | ५,१७५ |

## पाटोद्याचा पोलीस रक्षक झाला भक्षक

### महिलादिनी महिलेवर बलात्कार; सुरेश धसांसोबत नराधम उध्दव गडकरचे फोटो

**पाटोदा प्रतिनिधी**

**पाटोदा पोलीस ठाण्याचे बीट अमलदार उद्धव गडकर यांने महिला दिनानिमित्त कार्यक्रमासाठी एका महिलेला बोलावून पाटोदा येथील स्टेट बँकेच्या बाजूला असलेल्या घरात घेऊन त्या महिलेवर बलात्कार केल्याची घटना पाटोद्यात घडल्याने रक्षकच भक्षक झाल्याचे चर्चा सध्या पाटोद्यात सुरू आहे.नराधम पोलिस उध्दव गडकर यांचे**



**आ.सुरेश धस यांच्या सोबतचे फोटो सध्या व्हायरल होत आहेत.**

गेवराई तालुक्यातील महिला मागील काही प्रकरणात पाटोदा पोलीस ठाण्यात ये–जा करीत असल्याने पाटोदा पोलीस ठाण्यातील बीट अमलदार उद्धव गडकर या कर्मचाऱ्याच्या संपर्कात आली होती. यानिमित्ताने मोबाईल क्रमांकांची देवाणघेवाण झाली यातून त्यांच्यात संभाषण व मॅसेज आदी होत होते यांच संधीचा लाभ पान २ वर

## हत्येसाठी वापरलेल्या हत्यारांची रेखाचित्र समोर

### संतोष देशमुख हत्याप्रकरणी सीआयडीकडून धक्कादायक माहिती उघड

**बीड । पतिनिधी**

**सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या प्रकरणी सीआयडीने दाखल केलेल्या आरोपपत्रात हत्येसाठी वापरलेल्या हत्यारांची रेखाचित्रे समोर आली आहेत. आरोपपत्रात संतोष देशमुखांना केलेल्या अमानुष मारहाणीचेही तपशील आहेत.**

फसंतोष देशमुख यांचे अपहरण केल्यानंतर त्यांना अमानुष पद्धतीने मारहाण करण्यात आली. त्यांना



मारहाण करतानाचे काही फोटो

आणि व्हिडीओही व्हायरल झाले. यानंतर महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली. यानंतर मंत्री धनंजय मुंडे यांना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. यानंतर याप्रकरणी सीआयडीकडून पान २ वर

### कोणकोणत्या शस्त्राने मारहाण?

दरम्यान संतोष देशमुख यांना मारहाण करताना पाईपचा वापर करण्यात आला होता. त्यांना मारहाण करतेवेळी या पाईपचे तुकडे झाले होते. या पाईपचे १५ तुकडे सीआयडीने जप्त केले होते. या पाईपच्या १५ तुकड्यांचा फोटो आरोपपत्रात देण्यात आला होता. यानंतर आता या शस्त्रांचा फोटो समोर आला आहे. यात लोखंडी रॉड, पाईप आणि गॅस पाईप अशा शस्त्रांचा उल्लेख करण्यात आला आहे.

## भाजपासाठी काम करणाऱ्यांना बाहेरचा रस्ता !

### ज्याच्या मनात काँग्रेस त्यालाच पक्षात नेतृत्वाची संधी; राहुल गांधी यांची स्पष्टोक्ती

**अहमदाबाद । वृत्तसंस्था**

देशात इंग्रज होते ते भारतीयांच्या स्वातंत्र्यांवर नियंत्रण ठेवत होते. पण त्यावेळी काँग्रेस नेतृत्वाच्या शोधात होते. पण ते नेतृत्व आले दक्षिण आफ्रिकेतून याचा अर्थ असा नव्हे की, दक्षिण आफ्रिकेने काँग्रेसला नेतृत्व दिले. मात्र हे नेतृत्व दिले गुजरातने महात्मा गांधी यांच्या रुपाने. त्यांच्यानंतर दुसरे नेतृत्व मिळाले ते सरदार वल्लभभाई पटेल यांच्या रूपाने. गुजरातमधील जनता पर्यायाच्या शोधात आहे. पण आपण त्यांना पर्याय देण्यात कमी पडत आहोत. त्यामुळे गुजरातला नव्या दमाचे नेतृत्व द्यायचे असेल तर जे भाजपासाठी काम करत आहेत, अशांना काँग्रेसमधून बाहेरचा रस्ता दाखवावा पान २ वर



## जिल्ह्याच्या राजकारणात महिलांनी ठसा उमटवला

### डॉ.दिपाताई क्षीरसागर यांचे प्रतिपादन; परळीमध्ये महिला दिनानिमित्त चर्चासत्र

**बीड । प्रतिनिधी**

आजच्या युगात प्रत्येक क्षेत्रात स्त्री अग्रेसर आहे. बीड जिल्ह्यात स्व.केशरबाई काकू क्षीरसागर, स्व.विमलताई मुंदडा, खा.रजनी पाटील, मा.आ.उषाताई दराडे, पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे, मा.खा.प्रीतमताई मुंडे यांनी राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय पान २ वर



cmyk

## अग्रलेख

# दोन उपमुख्यमंत्र्यांच्या वर्तनातील तफावत नजरेत भरणारीच

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकार १०० दिवसात गतिमान कारभार करून काही वेगळे घडवून दाखवेल असे सांगत आले आहेत. सरकारी अधिकाऱ्यांनी या घोषणेला उचलून धरत आपल्याकडे जे काही चांगले होते त्याचे मार्केटिंग जोर जोराने सुरू केले आहे. या प्रकारात सरकारी अधिकाऱ्यांच्या मनात लपून असलेल्या नेतेपणाला वाव देखील मिळाला आहे. पण, एकाच जिह्यात एक पालकमंत्री आणि दोन संपर्क मंत्री लक्ष देणार असल्याच्या वार्तेने ते देखील वैतागले आहेत. भाजपने सर्वात आधी जेथे आपले मंत्री नाहीत त्या जिह्यात संपर्क मंत्री निर्माण केले. त्यांच्या पावलावर पाऊल टाकत एकनाथ शिंदे यांनी सुद्धा संपर्क मंत्री म्हणून आपल्या मंत्र्यांना एकाहून अधिक जिह्यांची जबाबदारी देण्याची खेळी केली आहे. जे काही मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात होईल ते माजी मुख्यमंत्री यांच्या कार्यालयातही उभे करण्याचा प्रयत्न सुरू आहे. ते स्वाभाविकही आहे.

अवघ्या तीन महिन्यात कोणी आपण हे राज्य अर्धा कार्यकाळ चालवले आहे हे इतक्या सहज विसरू शकत नाही. त्यात पुन्हा एकनाथ शिंदे यांच्यासारखा नेता तर असे सहजासहजी आपला पराक्रम विसरेल किंवा विसरू देईल हे मान्य करणेही कठीण. राज्यात आपल्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवली गेली त्यासाठी लाडकी बहिण योजना राबवण्याचे धाडस आपणच दाखवले आणि प्रतिकूल परिस्थिती असतानाही आपल्याच नेतृत्वात ती परिस्थिती पालटली हे शिंदे यांचे म्हणणे आहे. त्यामुळे ते बदललेल्या परिस्थितीतील प्रत्येक निर्णयावर नाराजी व्यक्त करत आहेत. दूर राहत आहेत. त्यांना आपल्या पूर्वीच्या निर्णयात हस्तक्षेप नको आहे. आपण आपला पक्ष फोडून आलो होतो त्यामुळे आपल्याला हलक्यात घेऊ नये हे त्यांनी अधिवेशनापूर्वी सांगून ठेवले आहे. परिणामी त्यांच्यात आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात एक प्रकारची स्पर्धा काही काळ अनुभवायला मिळणारच आहे. २०१४ मध्ये अशी स्पर्धा भाजप अंतर्गत अनेकांनी केली होती आणि त्या सर्वांना आपल्या पद्धतीने मागे रेटत फडणवीस यशस्वी ठरले कारण केंद्राची शक्ती त्यांच्या पाठीशी ठाम होती. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी आपले मुख्यमंत्री होणे अटळ आहे हे केवळ राज्यातील नव्हे तर देशातील त्यांच्या पक्षाच्या नेत्यांना देखील मान्य करायला भाग पाडले आहे. त्यामुळेच इतर राज्यांमध्ये मुख्यमंत्र्यांच्या नावाची चिठ्ठी आणून धक्कातंत्र अवलंबले गेले तसे महाराष्ट्रात मात्र घडलेले नाही. तीन महिन्यापूर्वी घडलेला हा इतिहास लोकांच्या लक्षात राहू नये अशी भाजपमधील अनेकांची भावना असली तरी फडणवीस आपल्या कृतीतून कोणालाही ते विसरू देत नाहीत. हे लक्षात घेतले पाहिजे. त्यांचा स्वत:चा आणि त्यांना इथपर्यंत आणून नेतृत्वाची धुरा सोपवलेल्या घटकांचा मनसुबा मोठा आहे. याची राज्यातील ज्या नेतृत्वाला माहिती आहे आणि आपण विरोधात गेल्याने फरक पडणार नाही याची ज्यांना खात्री आहे, ते फडणवीस यांच्याशी जुळवून घेत आहेत. ज्यांना ही वाढच मान्य नाही त्यांना दिल्लीतून किंवा अन्य कोठूनतरी आपल्या मागे शक्ती उभी राहील अशी आशा आहे. ते विरोधात ठाम उभे राहण्याचा प्रयत्न करत आहेत. याबाबतीत राज्यातील दोन उपमुख्यमंत्र्यांच्या वर्तनातील तफावत नजरेत भरण्यासारखीच आहे.

अजित पवार ज्या पद्धतीने आपल्या लाडक्या मंत्र्याचा राजीनामा मान्य करत आहेत ते लक्षात घेतले तर आपल्या विरोधाचा खूप परिणाम झालेला नाही आणि सरपंचाचे खुनाचे चिड आणणारे फोटो प्रसिद्ध झाल्यानंतर पाठीशी घालणे शक्य होणार नाही हे लक्षात आल्यानंतर दादांनी व्यवहारी मार्ग पत्करला आहे. त्याचे पडसाद त्यांच्या पक्षात कसे उमटणार आहेत हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

राज्याच्या राजकारणातून फडणवीस यांना भविष्यात पुढच्या राजकारणासाठी उंच उडी मारावी लागू शकते. त्यासाठी राज्यात असतानाच त्यांना आपली प्रतिमा उज्वल करावी लागणार आहे. शिवराज सिंह चौहान, वसुंधरा राजे, योगी आदित्यनाथ, रमणसिंह, कल्याणसिंह अगदी राजनाथ सिंह यांच्या वाटेतील अडथळे, त्यांच्या राज्यात त्यांच्या सरकारला लागलेले डाग आणि त्यांचे वय या बाबी विरोधात जाणाऱ्या होत्या. याच बाबी आपल्या विरोधात जाऊ नयेत याची दक्षता फडणवीस घेऊ लागले आहेत. परिणामी त्यांना आपली प्रतिमा स्वच्छ राखणे आणि आपल्या मंत्रिमंडळात कोणी भ्रष्ट नाही, आपण त्यांना सहन देखील करत नाही असा संदेश जनतेपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न सुरू आहे. पण, जयकुमार गोरे, राजकुमार रावल अशा स्वपक्षातील तर मंत्री कोकाटे, माजी मंत्री तानाजी सावंत, अब्दुल सत्तार आणि खूपच गाजलेले धनंजय मुंडे अशा मंत्र्यांची नावे आणि कारनामे पुढे आल्याने फडणवीस यांच्याबाबतीत किती ठाम भूमिका घेणार हे दिसेलच. राज्याच्या तिजोरीची सध्याची अवस्था त्यात प्रतिकूल आर्थिक सर्वे, डॉलर वधारला असल्याचा परिणाम यामुळे महाराष्ट्रावर वाढणारा बोजा हा खूपच महत्त्वाचा घटक आहे. राज्याचा अर्थसंकल्प सादर होत असताना एक राजकीय आणि एक आर्थिक आव्हान सरकारसमोर उभे आहे.

# विशेष पोलीस महानिरीक्षक यांचेकडून पोलीस दलाची तपासणी

**जालना । प्रतिनिधी**

**जालना पोलीस अधीक्षक कार्यालय अंतर्गत पोलीस दलातील तपासणी पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा यांच्याकडून नियमाप्रमाणे करण्यात आली. मा. विशेष पोलीस महानिरीक्षक यांचे वार्षिक निरीक्षण सन २०२४-२०२५ चे अनुषगांणे मा. श्री. विरेंद्र मिश्र, विशेष पोलीस महानिरीक्षक, यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयाचे दोन दिवशीय वार्षिक तपासणी केली. वार्षिक तपासणी दरम्यान वेगवेगळे कार्यक्रम, कल्याणकारी व समुदाय (कम्युनिटी) पोलीसींग संबंधीत कार्यक्रमांचे उदघाटण केले. यावेळी पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल व अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, विशेष गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्यासह पोलीस प्रशासनामधील सर्व टीम तपासणी वेळे होती.**

वार्षिक तपासणी दरम्यान महीला व बाल सुरक्षा जनजागृती अनुषगांने तयार करण्यात आलेले ''सुरक्षा मंत्र आधुनिक जगात एक पाऊल पुढे'' या पुस्तकाचे विमोचन केले. जालना पोलीस दलाच्या या नाविन्यपूर्ण कल्पनेचे मा. विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी कौतुक केले. पोलीस अधीक्षक कार्यालयातील सर्व शाखांना भेट देऊन त्यांचे कामकाजाचा आढावा घेतला, लोकोपकारी व तत्परतेने काम करण्याबाबत मार्गदर्शन केले. कार्यालयीन कामकाजामध्ये नियमीत सुधारणा करणे मला अपेक्षित आहे अशा सूचना देण्यात आल्या. दि ०७ मार्च रोजी पोलीस मुख्यालय येथे वार्षिक निरीक्षण अनुषगांने परेडचे निरीक्षण केले. दंगा काबु नियंत्रण, बॉम्ब शोधक व नाशक, श्वान पथक, अंगुलीमुद्रा, मोबाईल फॉरेन्सीक व्हॅन व दहशतवादी-आतंकवादी यांना जलदगतीने ताब्यात घेणे या सर्व बाबींचे प्रात्यक्षीकांचे निरीक्षण केले. पोलीस अधिकारी व



अंमलदार आणि मंत्रालयीन कर्मचारी यांचे सैनिक सम्मेलन घेऊन अडी-अडचणी बाबत माहीती घेऊन अखत्यारीत असलेल्या समस्यांची जागीच सोडवणुक केली व शासन दरबारी असलेल्या अडचणींचा पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले आहे. मा. विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी पोलीस मुख्यालय येथे मोकळया जागेत वृक्षारोपण करुन त्यांचे संगोपण करण्यासाठी सुचना दिल्या. पोलीस वसाहत येथील बाल उद्यानाचे नुतनीकरणाचे उदघाटन केले. अधिकारी व अंमलदार यांचे शारीरीक व मानसिक स्वास्थ सदृढ ठेवण्यासाठी पोलीस मुख्यालय परीसरात असलेल्या व्यायामशाळेचे नुतनीकरणाचे त्यांचे हस्ते उदघाटन करण्यात आले आहे. पोलीस अधीक्षक कार्यालय येथे सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी व शाखा प्रभारी अधिकारी यांचे समवेत गुन्हे आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीमध्ये गुन्हे, अर्ज, समन्स वॉरन्ट, मुद्येमाल निर्गती, दोषसिध्दी, जप्त वाहणांचा आढावा घेतला. गुन्हयांचे गुणवत्तापूर्ण व मुदतीत तपास पूर्ण करण्याच्या आणि प्रलंबीत गुन्हयांची निर्गती करण्या बाबत मार्गदर्शन करुन सुचना दिल्या. लोकोपकारी व कायदेशीर कामकाज करण्या बाबत मार्गदर्शन करुन सुचना दिल्या. तसेच मा. मुख्यमंत्री यांचे १०० दिवसीय सात (७) मुद्यांचे अनुषगांने स्वच्छता, सुखर जिवण, कार्यालयीन सोई-सुविधा, नाविन्यपूर्ण उपक्रम, तंत्रज्ञानाचा वापर इत्यादीच्या अमलबजावणी करण्याच्या अनुषगांने मार्गदर्शन करुन अमलबजावणी करण्या बाबत सुचना दिल्या. पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना गुन्हयांची त्वरीत दखल घेणे, त्वरीत गुन्हयाचे घटनास्थळास भेटी देणे व नियमीतपणे गाव भेटी देण्याबाबत आणि सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी यांना आपापल्या उप विभागात देखरेख ठेवण्या बाबत सुचना दिल्या आहेत. मागील वर्षभरात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या अधिकारी व अंमलदारांचे कौतुक करुन प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले आहे.

# सोमवारी माऊली मोटर्सचा मांजरसुंबा येथे उद्घाटन समारंभ

**बीड। प्रतिनिधी**

**उद्योग क्षेत्रात एक विश्वसनीय नाव असलेल्या माऊली मोटर्स च्या माऊली टायर्स, टायर रमोल्डींग, माऊली ऑटोमोबाईल्स, माऊली गॅरेज, निखिल फायनान्स आणि इन्शुरन्स चा भव्य उद्घाटन सोहळा सोमवार दि. १० रोजी सकाळी ११.१५ वाजता मठाधिपती लक्ष्मण महाराज मेंगडे, माऊली महाराजा मंझरीकर, डॉ. विरूपाक्ष शिवाचार्य महास्वामीजी, हरीहर महाराज कोळवाडीकर, वैजिनाथ महाराज शिंदे कपिलधारवाडी दत्त संस्थान बालाघाट (मांजरसुंबा), विलास महाराज शिंदे चौसाळा आदिनाथ महाराज, ज्ञानेश्वर महाराज सुरवसे यांच्या हस्ते होणार आहे.**

शहाजी यमपुरे, धनंजय यमपुरे, चंद्रकांत यमपुरे,यांनी उद्योग क्षेत्रात उत्कृष्ट सेवा देऊन माऊली मोटर्स मांजरसुंबा येथे नव्याने माऊली टायर्स, टायर रमोल्डींग, माऊली ऑटोमोबाईल्स, माऊली गॅरेज, निखिल फायनान्स आणि इन्शुरन्स चा भव्य उद्घाटन सोहळा सोमवार दि. १० रोजी सकाळी ११.१५ वाजता होणार आहे. खा.बजरंग सोनवणे, आ. संदिप क्षीरसागर, आ.सुरेश धस , मा.मंत्री जयदत्त क्षीरसागर , मा.सय्यद सलीम,मा. रवींद्र क्षीरसागर ,मा.डॉ.योगेश क्षीरसागर ,मा.राजेंद्र मस्के.मा. कुंडलिक खांडे,मा. स्वप्निल गलधर ,मा.अरुण डाके,मा. संपादक गंगाधर नाना काळकुटे, मा.नारायण शिंदे,मा. भारत काळे,मा नितीन धांडे ,मा.रमेश पोकळे ,मा.तानाजी कदम, मा.अजित वरपे,मा.बाबु लोढा.आदींची उपस्थिती राहणार आहे. तरी उद्घाटन समारंभ मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कुमार, दवणे, करपे, यमपुरे यांनी केले आहे.

# दिंडी प्रदक्षिणाने होणार संगीतमय श्रीमद भागवत कथा सोहळ्यास प्रारंभ

बीड । प्रतिनिधी



बीड तालुक्यातील नांदूर फाटा जवळील खर्डेवाडी ता. जि.बीड येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी पाचवा वेद निर्माते जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांचा बीजसोहळा मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे या बीज उत्सवानिमित्तआज दि.९/३/२०२५ रोजी सकाळी ९ वाजता शिवप्रतिष्ठान वारकरी शिक्षण संस्था दहिफळ वड माऊली येथील ह.भ.प.बाळू महाराज बसवर आणि त्यांचे शिष्यगण हे संत तुकाराम महाराज व राधा कृष्ण यांच्या वेशभूषेत दिंडीत सहभागी होणार आहेत तसेच भजनी मंडळ देखील दिंडीत सामील होणार आहे ह.भ.प. सौ.साक्षीताई कराडकर तसेच सर्व गायनाचार्य वादनाचार्य यांचे स्वागत मोठ्या उत्साहात होणार आहे त्यांनतर दुपारी १ वाजता संगीतमय श्रीमद संगीत भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा प्रारंभ होणार आहे. या संगीतमय भागवत कथेसाठी तबलासाथ ह.भ.प श्री राम महाराज गायकवाड, शिंथवादन व गायनाचार्य ह.भ.प.श्री तुकाराम महाराज कराडकर, गायन साथ ह भ प शालिनीताई जाधव बीड, ऑक्टोपॅड वादक श्री रवी महाराज हिंगोली हे आहेत कथा वेळ दुपारी १ते ५अशी आहे. या सात दिवस होणाऱ्या श्रीमद्? भागवत कथा अमृत श्रवणाचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक समस्त कळेकर परिवार व महादेव नाना साळुंके यांनी केले आहे.

# मुला मुलींच्या परीक्षा सुरू असल्यामुळे लाईट कनेक्शन बंद करू नये - रमेश तारगे

**जालना । प्रतिनिधी**

घनसावंगी व अंबड तालुक्यातील एम एस ई बी च्या वतीने लाईट कलेक्शन बंद करण्याचे मोहीम सुरू असून या संबंधित सध्या दहावीच्या व बारावीच्या परिक्षा सुरू आहेत त्याच बरोबर पाचवी ते नववी च्या परिक्षा सुरु आहेत. लाईट कनेक्शन बंद करण्यात येत असल्यामुळे भविष्यामध्ये मुला मुलींची नुकसान होण्याची शक्यता आहे जर तसा काही प्रकार घडल्यास व मुला मुलींची नुकसान झाल्यास तिची जबाबदारी महावितरण च्या कर्मचारी व अधिकाऱ्यांची राहील. या काळात गावामध्ये रात्रीची लाईट असणे आवश्यक आहे.परंतु महावितरण विभागाकडून विज बील वसुली साठी घनसावंगी अबंड तालुक्यातसह जिल्ह्यातील खेडेगावाची लाईट खडींत करणे सुरू आहे. महावितरण विभागाचे अधीक्षक अभियंता मठपती यांचे काम अत्यंत चागले आहे त्यांना ग्रामीण भागाची जान आहे परंतु लोकांना विजपुरवठा खडींत करुन विज बील भरण्यासाठी वेठीस धरण्याचा मार्ग योग्य असला तरी विद्यार्थ्यांचे भविष्याचा विचार केला तर ते योग्य दिसत नाही घनसावंगी तालुक्यातील माहेजवळा सह अन्य गावात लाईट बंद आहे चार दिवसापूर्वी बहिरेगाव येथील विजपुरवठा खडींत केला होता मी स्वयं व गावकरी बाळासाहेब बोरकर यांनी बील भरण्यासाठी आवाहन केले तर लोकानी प्रतिसाद दिला महावितरण विभागाकडून सहकार्य झाले .त्या प्रमाणे कार्यवाही अपेक्षित आहे. या घडीला विजपुरवठा तात्काळ सुरु करण्यात यावे नसता त्याचे गंभीर परिणाम होतील. जिल्ह्यामध्ये महायुतीचे लोकप्रतिनिधी आहेत आणि अधिवेशन सुरु आहे. सरकारची बदनामी होईल असे काम करु नये ही अशी ही विनंती करण्यात आली आहे.नसता सोमवारी आक्रमक पणे याविषयी होईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी रमेश गणपत तारगे अशासकीय सदस्य ग्राहक संरक्षण परिषद सदस्य यांनी यावेळी म्हटले आहे.

## पान १ वरून...

### महिलांवरील हिंसाचार रोखण्यासाठी

फ्समारोप कार्यक्रमात बेटी बचाओ, बेटी पढाओ अभियानाची प्रतिज्ञा घेतली. यावेळी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, बेटी बचाओ व बेटी पढाओ, या उपक्रमाने स्त्री भ्रूण नष्ट करण्याचे प्रमाण कमी झाले आहे. ज्या जिल्ह्यात विषमता आहे, तिथे मुलांना लग्नासाठी मुली मिळत नाही. त्यातून कळते कसा मूर्खपणा आपण करून ठेवला आहे. ज्या जिल्ह्यात मुलींची संख्या कमी आहे, तिथे सुधारणा सुरु केल्या आहेत. मी सुद्धा एका मुलीचा बाप आहे. त्यामुळे मला अनुभव येतोय की, मुली या मुलांपेक्षा कशा चांगल्या असतात. महिलांची ही शक्ती पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ओळखली व सगळ्या संरक्षण क्षेत्रात महिलांना संधी दिली. आमच्या सारख्या पुरुषांना आता भीती आहे की, राजकारणात आता ३३ टक्के महिलांना २०२९ पासून संधी असेल. या देशात महिलांचे राज्य असेल. याचा मला आनंद आहे, असे ते म्हणाले.

--------

### मराठवाड्यासह खानदेशचा

१२ हजार ९५२ टन उसाचे गाळप करत सरासरी ८.०४ टक्के साखर उताऱ्याने ३६ लाख २९ हजार ६५५ क्विंटल साखरेचे उत्पादन केले.

**मराठवाड्यातील गाळप स्थिती**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील तीन सहकारी व चार खासगी मिळून सात कारखान्यांनी १८ लाख ३४६७ टन उसाचे गाळप करत सरासरी ९.२% साखर उताऱ्याने १७ लाख ८९ हजार १०४ क्विंटल साखरेचे उत्पादन केले. जिल्ह्यातील सात पैकी दोन कारखान्यांचे गाळप अनुक्रमे १८ व २८ फेब्रुवारी रोजी थांबले आहे. जालना जिल्ह्यातील दोन सहकारी व दोन खासगी मिळून ४ कारखान्यांनी यंदाच्या ऊस गाळपात सहभाग घेतला.

------------

### शक्तिपीठमधून सरकारमधील

महामार्ग दळवळणासाठी पुरेसा आहे. परंतु तो असतानाही नवीन महामार्गाचा घाट केवळ भ्रष्टाचारासाठी घातला जात आहे. शेतकऱ्यांची कर्जमाफी, हमीभाव कायदा, मराठवाड्याला पाणी अशी प्राथमिकता सरकारने ठेवली पाहिजे. परंतु त्यांच्याकडून केवळ पक्ष फोडाफोडीत आमदारांचे जे दर लावले, तो पैसा वसूल करण्यासाठी कंत्राटदारांच्या भल्यासाठी महामार्ग केला जात आहे. असा आरोप शेट्टी यांनी केला. तसेच शेतकऱ्यांच्या जमिनीच्या तुकड्याला हात लावला तरी शेतकरी राज्यकर्त्यांना सळो की पळो करून सोडेल, असा इशाराही शेट्टी यांनी दिला आहे. पुढे शेट्टी म्हणाले, मंत्री लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांच्या संगनमताने जळवपास ५७ हजार कोटींचा भ्रष्टाचार शक्तिपीठ रस्त्याच्या माध्यमातून होणार आहे. टोलच्या माध्यमातून सामान्य जनतेची पिळवणूक होणार आहे. त्यासाठी शक्तिपीठ आणि रत्नागिरी ते नागपूर समांतर मार्गामुळे प्रकल्प खर्च आणि टोलमधून मिळणारं उत्पन्न ४० ते ५० वर्ष जनतेला भरावं लागेल, असंही शेट्टी म्हणाले. दरम्यान, राज्यातील शेतकऱ्यांनी शक्तिपीठला विरोध केला आहे. तसेच त्यासाठी कृती समिती स्थापन केली आहे. शक्तिपीठ महामार्ग राज्यातील १२ जिल्ह्यातून जाणार आहे. परंतु बहुतांश शेतकरी मात्र या महामार्गाला विरोध करत आहेत. त्यासाठी आंदोलन मोर्चा करून सरकारच्या निर्णयाच्या विरोधात भूमिका घेतली जात आहे. परंतु राज्य सरकार मात्र शक्तिपीठ आग्रही असल्याचं दिसत आहे.

**कृती समितीची आक्रमक भूमिका**

राज्यात शक्तिपीठ महामार्गावरून कृती समितीने आक्रमक भूमिका घेतली आहे. तसेच मुंबईच्या आझाद मैदानावरून मोर्चाही आयोजित केला आहे. शक्तिपीठ महामार्गात शेतकऱ्यांची सुपीक जमीन गिळली जाणार आहे, असा कृती समितीचा आरोप आहे. तसेच कोल्हापूर अनाई सांगलीमध्ये या महामागरामुळे महापुराचा प्रश्नही अधिक गंभीर होईल, अशी भीती शेट्टी यांनी व्यक्त केली.

----------

### परळीचा अवैध कत्तलखाना

तीन गोरक्षकांनी हे आमरण उपोषण सुरू केले होते. उपोषणाच्या आजच्या सहाव्या दिवशी उपोषणकर्त्यांची प्रकृती अतिशय खालवल्याचेही दिसून आले. याच अनुषंगाने परळीतील व्यापारी व सर्व स्तरातील सकल हिंदू समाज बांधव मोठ्या संख्येने या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी रस्त्यावर उतरले होते. राणी लक्ष्मीबाई टावर चौकापासून ते नगरपरिषद कार्यालयापर्यंत हा मूक मोर्चा जाऊन धडकला. त्यानंतर प्रशासनाला खडबडून जाग आली. पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनीही उपोषणार्थ्यांशी संवाद साधून आपले उपोषण मागे घेण्याबाबत मध्यस्थी केली. तसेच त्यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने तातडीने योग्य ती कारवाई करावी अशा प्रकारचे निर्देश प्रशासनाला दिले. त्यानंतर लेखी आश्वासनाचे पत्र परळी नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांनी उपोषणकर्त्यांना दिले. उपोषण स्थगित झाल्यानंतर या उपोषणकर्त्यांना पुढील उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

**अवैध कत्तलखाना जमीनदोस्त होणार**

या दरम्यान दिलेल्या आश्वासनाप्रमाणे नगरपरिषद मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे यांनी तातडीने पावले उचलत नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांना अवैध चालू असलेला कत्तलखाना बंदिस्त करण्याची कारवाई केल्याचे दिसुन आले. परळी नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने हा अवैध कत्तलखाना पत्रे ठोकून आता सील करण्यात आला आहे. एकंदरीतच गोरक्षकांच्या सहा दिवसाच्या आंदोलनाला यामुळे काही प्रमाणात यश मिळाले असुन तूर्तास हा कत्तलखाना प्रशासनाने सील केला आहे. स्ट्रक्चरल ऑडिट साठी प्रस्ताव पाठवण्यात आला असुन या प्रस्तावाला जिल्हाधिकाऱ्यांची मंजुरी मिळाल्यानंतर हा अवैध कत्तलखाना जमीनदोस्त करण्यात येणार असल्याचेही प्रशासनाने सांगितले आहे.

--------------

### हत्येसाठी वापरलेल्या हत्यारांची

कसून चौकशी सुरु आहे. सीआयडीने याप्रकरणी आरोपपत्र दाखल केले आहे. या आरोपपत्राद्वारे अनेक खुलासे समोर येताना दिसत आहेत.

संतोष देशमुख यांची हत्या करण्यासाठी आरोपींनी जी हत्यारे वापरली होती, ती सर्व हत्यारं सीआयडीच्या ताब्यात आहेत. काही हत्यारे ही सुस्थितीत आहेत. तर काही हत्यारांचे तुकडे झाले होते. ते देखील जप्त करण्यात आले होते. तसेच काही हत्यारांची रेखाचित्रं ही सीआयडीने बनवलेली आहेत. ती आरोपपत्रात जोडलेली आहेत. त्याचा रेखाचित्र समोर आली आहेत.

--------

### हरिण मारणाऱ्या खोक्याला

धमकी देण्यात आली आहे. तसेच त्याच्या घराची झाडाझडती घेण्यात आली असून त्याच्या घरात बरेच पुरावे सापडले आहेत. त्यामुळे खोक्या पुरता अडकला असून त्याच्या बरोबर आ. सुरेश धस यांच्याही अडचणीत वाढ होणार असल्याचे संकेत आहेत.

---------

### पाटोद्याचा पोलीस रक्षक

घेत त्या कर्मचाऱ्याने महिला दिनाचे निमित्त सांगुन त्या महिलेला पाटोदा येथे बोलावून घेतले होते ती महिला पाटोद्यात आली असता स्टेट बँक च्या बाजूला घेऊन जात महिलेवर बलात्कार केला.यावेळी त्या महिलेने आरडाओरड करण्याचा प्रयत्न केला मात्र तिला चोरीचा खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी देत बलात्कार केला.दुपारी १ वाजण्याच्या सुमारास ती महिला तक्रार दाखल करण्यासाठी पाटोदा पोलीस ठाण्यात येवून स्वतः पोलीस निरीक्षक यांच्या समोर सांगितले आहे.दुपारी १ वाजल्यापासून ती महिला पोलीस ठाण्यातच बसून होती घटनेची गांभीर्य पाहून पोलीस उपअधीक्षक बाळकृष्ण हुनगुडे पाटील यांनी पाटोदा पोलीस ठाण्यात भेट देत व तपासा संदर्भात सुचना केल्या संध्याकाळी ६-३० सुमारास त्या महिलेला वैद्यकीय तपासणीसाठी बीड येथे पाठविण्यात आले आहे. त्या पोलीस कर्मचाऱ्याच्या विरोधात गुन्हा क्र ७७/२५ भा.द.वी ६४/२ -(१) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पाटोदा पोलीस करत आहे.

-------------

### जिल्ह्याच्या राजकारणात महिलांनी

कामगिरी बजावली. महाराष्ट्राच्या इतिहासात त्यांची नोंद झालेली असून कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे, असे प्रतिपादन बीड येथील नवगण शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी व्यक्त केले. परळी येथील जवाहर शिक्षण संस्था संचलित वैद्यनाथ महाविद्यालय, नवगण शिक्षण संस्था संचलित नवगण महाविद्यालय, कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, इनरव्हिल लेडीज क्लब, परळी वैजनाथ यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्य पोलीस महिला ई-तक्रार या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे शनिवारी आयोजन जागतिक महिला दिनानिमित्त वैद्यनाथ कॉलेजमध्ये घेण्यात आले होते. याप्रसंगी बीड येथील नवगण शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर ह्या बोलत होत्या. व्यासपीठावर अध्यक्ष लक्ष्मीबाई देशमुख ह्या होत्या. महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.विद्या देशपांडे, डॉ.दिपा क्षीरसागर, प्राचार्य डॉ.ए.आर. चव्हाण, प्राचार्य डॉ.मधुकर आघाव, श्रद्धा हालगे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक डॉ.वीरश्री आर्या यांनी केले. पुढे बोलताना डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी पूर्वीच्या काळात अनिष्ट रूढी परंपरा असल्या कारणास्तव स्त्रियांची परिस्थिती अत्यंत बिकट होती, परंतु सद्यस्थितीच्या काळात स्त्रियांना विविध प्रकारचे अधिकार प्राप्त झालेल्या होणे त्यांच्यात परिवर्तने घडून आली आहे. स्त्रियांनी चूल आणि मूल एवढाच कार्य न करता त्यांनी स्वकर्तबगारीने कार्य करावे. त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर व सावित्रीबाई फुले यांच्यामुळेच कायदा व शिक्षणाचा अधिकार स्त्रियांना प्राप्त झालेला आहे, असे सांगून आजच्या युगात स्त्रिया विविध क्षेत्रात अग्रेसर आहेत, असे त्या म्हणाल्या. प्राचार्य डॉ. विद्या देशपांडे यांनी शिक्षण क्षेत्रात महिलांनी उल्लेखनीय कामगिरी बजावलेली आहे. त्याबरोबर मुलींनी स्वतःची काळजी स्वतःच घेतली पाहिजे असे मत याप्रसंगी व्यक्त केले. तसेच जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने पोस्टर प्रदर्शन, जागर - गोंधळ, सेल्फी पॉइंट, लेक माझी सावली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषक देखील प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आले. कार्यक्रमात नवगण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मधुकर आघाव यांनी प्राचीन काळात व सद्यपरिस्थितीच्या काळात स्त्रियांची स्थिती कशा पद्धतीची आहे, याविषयीचे विवेचन केले. आभार प्राचार्य डॉ. ए.आर.चव्हाण यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ.मीना म्हेत्रे व प्राध्यापक रजनी शेटे यांनी केले. या कार्यक्रमाला तिन्ही महाविद्यालयातील प्राध्यापक महिला व विद्यार्थिनी व परळी शहरातील महिलांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती.

-----------

### भाजपासाठी काम करणाऱ्यांना

लागणार असल्याचे काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी इशारा दिला. गुजरातमधील अहमदाबाद येथे काँग्रेस कार्यकर्त्यांच्या आयोजित मेळाव्यात ते बोलत होते. राहुल गांधी पुढे बोलताना म्हणाले, मध्यंतरी मध्य प्रदेशातील एक शिष्टमंडळ मला भेटायला आले होते. त्यांच्याशी संवाद साधताना एका कार्यकर्त्याने मला सांगितले की, घोडे हे दोन पद्धतीचे असतात. त्यातील एक घोडा असतो तो लग्नाच्या वरातीसाठी आणि दुसरा घोडा असतो तो रेससाठी. पण काँग्रेस काय करतेय की लग्नाच्या घोड्याला रेसमध्ये पाठवले जातेय, मग रेस कशी जिंकणार. त्या पद्धतीने गुजरातच्या काँग्रेस पक्षातही दोन पद्धतीचे लोक आहेत. एक जो जनतेमध्ये मिसळतो, लोकांशी जोडलेला असतो, त्याच्या मनात काँग्रेसची विचार धारा आहे आणि त्या विचारधारेशी एकनिष्ठ रहात पक्षाचे काम करतो. तर दुसरा जो आहे तो जनतेसोबत नसतो, त्यांच्यात मिसळत नाही, लोकांपासून वेगळा राहतो, तो काँग्रेस पक्षात असला तरी तो काम करतो ते भाजपाचे. त्यामुळे आपल्याला अशा भाजपासाठी काम करणाऱ्या ३०-४० जणांना भलेही बाहेर काढावे लागले तरी त्यांना बाहेर काढू आणि ज्याच्या मनात काँग्रेसची विचारधारा आहे, काँग्रेससाठीच काम करतो त्याच्याकडे नेतृत्वाची धुरा सोपविण्यात येईल असे यावेळी म्हटले. पुढे बोलताना राहुल गांधी म्हणाले की, मागील १५-२० वर्षापासून काँग्रेसला गुजरातमध्ये ४० टक्के मते मिळत आहेत. तसेच चर्चा असते ती फक्त निवडणूकांचीच पण आपण गुजरातच्या जनतेशी जोडले जात नाहीत, त्यांच्यात मिसळत नाही, तसेच आपण अशा लोकांना उभे करतो, त्यातील एक भाजपाचा असतो तर एक जण आपल्या विचारांचा, मग आपल्याला गुजरातच्या जनतेकडे सत्ता मागण्याचा कोणताच अधिकार रहात नाही असेही यावेळी ते म्हणाले. शेवटी बोलताना राहुल गांधी म्हणाले की, मला इथल्या सर्वसामान्य जनतेशी, व्यापाऱ्यांशी, मध्यम व्यापाऱ्यांशी आणि तरूणांशी जोडाले जायचे आहे. त्यामुळे या सर्वांशी जोडले जाण्याचे काम आपण सर्वांना करायचे आहे. तेलंगणात आम्ही १०-१२ वर्षात तेथील मतांच्या टक्केवारीत २२ टक्क्यांची वाढ केली. पण गुजरातमध्ये ४० मते मिळत असूनही फक्त पाच टक्के मतांची वाढ आपल्याला करायची आहे, पण तेही आपल्याकडून होत नाही. हे जोपर्यंत होत नाही तो पर्यंत सत्ता मिळणार नाही. त्यामुळे पुढील पाच ते १० वर्षे फक्त यासाठी काम करावे लागणार असल्याचेही यावेळी सांगितले.

## हिवरसिंगा येथे साडे चौदा लाखाचा गुटखा पकडला; एकास अटक

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात अवैध धंद्यावर कठोर कारवाया करून अवैध धंद्याचे समूळ उच्चाटन करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक श्री.नवनीत सर यांनी दिल्या आहेत. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. उस्मान यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून हिवरसिंगा ता. शिरूर कासार येथील एक इसम याने महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत गुटख्याचा साठा केला असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी त्यांचे पथकास सुचना देवून कारवाईसाठी रवाना केले असता

दिनांक ०८/०३/२०२५ रोजी मौजे हिवरसिंगा ता. शिरूर येथे इसम नामे बंडू निवृत्ती जाधव रा. हिवरसिंगा यांचे घरी छापा टाकला असता एकूण १४,५०,३२०/- ₹ किंमतीचा विमल गुटखा मिळून आला. संबंधित आरोपी विरुद्ध पोलीस स्टेशन शिरूर कासार येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई मा.श्री. नवनीत सर, पोलीस अधीक्षक बीड, मा.श्री. सचिन सर, अप्पर पोलीस अधीक्षक, बीड मा.श्री.उस्मान सर, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम, पो.हवा.अशोक, दीपक, सोमनाथ, बाळू, अर्जुन, नारायण, सिद्धेश्वर असे स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी केली आहे.

# काम दमदार पण प्रसिद्धीपासून लांब

### विविध क्षेत्रातील महिलांची फिनिक्स गगनभरारी; महिला दिनानिमित्त सोमवारी आष्टी तालुका युवा पत्रकार संघ राज्यस्तरीय पुरस्कार देऊन करणार सन्मान

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

समाजात काम करत असताना आपलं काम अन्? आपण असा मनात निश्चय करून गेल्या अनेक वर्षापासून कुठलीही अपेक्षा न करता आपल्या क्षेत्रात दमदारपणे काम करून फिनिक्स पक्षाप्रमाणे आकाशात गगनभरारी घेऊन आपल्या कर्तत्वचा ठसा उमटविला. एक महिला असून ही आपले एक वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या आष्टी तालुक्यातील जिगरबाज व कर्तृत्ववान महिलांचा सोमवार दि १० मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त आष्टी पंचायत समिती येथील सभागृहात सकाळी ११ वाजता आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने राज्यस्तरीय नारी सन्मान पुरस्कार देऊन गौरव व सन्मान करण्यात येणार आहे. या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याला मोठ्या संख्येने विविध क्षेत्रातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम यांनी केले आहे.




शहरात व ग्रामीण भागात विविध क्षेत्रात काम करून महिला नेहमीच पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून हम भी किसीसे कम नही हे अनेक वेळा महिलांनी आपल्या कर्तृत्वाने दाखवून दिले आहे. महिला ही जगात प्रत्येक क्षेत्रांमध्ये आघाडीवर आहेत मग ते क्षेत्र राजकीय असो किंवा शैक्षणिक औद्योगिक, सामाजिक असो किवा प्रशासकीय असो शेतीशी निगडीत असो. प्रत्येक क्षेत्रात महिलांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. अशाच काही महिलांचा ज्या प्रसिद्धीपासून कोसो दूर राहून पडद्या मागची भूमिका दमदार पणे पार पाडत आहेत.

या पुरस्कार सोहळयाला उपविभागीय अधिकारी वसीमा शेख या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असणार असून प्रमुख उपस्थिती म्हणून तहसीलदार वैशाली पाटील, पोलिस उपविभागीय अधिकारी बाळकृष्ण हानपुडे, गटविकास अधिकारी गोकुळ बागलाणे, पोलिस निरीक्षक शरद भुतेकर, नगराध्यक्षा बेग मिर्झा आयशा इनायतुल्ला, एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी ज्योती बेल्हेकर, गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव, मुर्शदपूर कासारी ग्रामपंचायतीच्या सरपंच शालिनी अशोक मुळे,नायब तहसीलदार बाळदत्त मोरे, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, ग्रामीण रुग्णालय अधिक्षक डॉ चारूदत्त पवार, तालुका आरोग्य अधिकारी डॉ राजेश तांदळे, केंद्रीय फिल्म सल्लागार समिती मंडळ सदस्य डॉ स्मिता बारवकरमहावितरण कंपनीच्या सहाय्यक अभियंता कोमल शिंदे, डॉ प्रियांका सिंघण आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी या सोहळ्याला जास्तीत जास्त महिलांनी उपस्थित रहावे असे आवाहन आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, उपाध्यक्ष निसार शेख, सचिव जावेद पठाण, कार्याध्यक्ष अक्षय विधाते, संघटक समीर शेख, सहसचिव संतोष नागरगोजे,कार्यवाहक अतुल जवणे, गहिनीनाथ पाचबैल,कोषाध्यक्ष प्रेम पवळ, संतोष तांगडे, ॲड किशोर निकाळजे, सोपान पगारे,सल्लागार राजेंद्र लाड,संतोष दाणी,बा म पवार,अजय कापरे, विठ्ठल राख, ओंकार कदम, संस्कार लाड,मारूती संत्रे, सचिन पवार आदी परिश्रम घेत आहेत.

### राज्यस्तरीय नारी सन्मान पुरस्काराने सोमवारी यांचा होणार सन्मान

वैशाली मुकुंद साबळे (आदर्श माता ),रेखा भाऊसाहेब घुले(आदर्श शेतकरी महिला ),वंदना परिवंत गायकवाड (आदर्श महिला सरपंच), ब्रह्मकुमारी सुशिला बहेनजी (आध्यात्मिक समाजकार्यातील उत्कृष्ट महिला),कु.डॉ.शेख मेहविश आरा (आदर्श महिला वैद्यकीय अधिकारी), कीर्ती हांगे (आदर्श महिला शिक्षिका), ॲड स्वाती राजेंद्र जाधव (आदर्श शैक्षणिक व समाजकार्य ), श्रीमती कवडे अनिता साहेबराव (आदर्श ग्रामसेविका), अंकिता राजेंद्र जाधव ( आदर्श ग्राम महसूल अधिकारी), ज्ञानेश्वरी शंकर लांडे (आदर्श पशुधन पर्यवेक्षक महिला अधिकारी), ह भ प पुष्पाताई उमेश जगताप (उत्कृष्ट समाज प्रबोधनकार महिला), दिपाली अशोक काकडे (उत्कृष्ट खेळाडू), बावदाणकर संजीवनी सोपान (आदर्श कृषी सहाय्यक महिला), रुक्मिणी संपत मराठे (आदर्श अंगणवाडी सेविका), सुनिता रामदास जगताप (आदर्श आशा वर्कर), अंजली दिगंबर वाघमारे (उत्कृष्ट सुपरवायजर), सोनाली रुपेश उपाध्ये (उत्कृष्ट महिला उद्योजिका), ॲड पुष्पा भगत- गायकवाड (आदर्श महिला विधीज्ञ ), विजया मुळे (आदर्श समाज कार्य महिला) शिवनेरी महिला बचत गट पांढरी (आदर्श महिला बचत गट), वंदना सुरेश भैसाडे (आदर्श परिचारिका), वैष्णवी नामदेव रांगुळे (आदर्श कवियत्री), पूजा बिबीषण देवळकर- धोंडे (आदर्श महसूल सेविका), अर्चना सुभाष आरडे (उत्कृष्ट महिला पोलीस कर्मचारी), कल्पना गणेश पाटील (आदर्श सून ), सविता उगले (आदर्श सेविका), कोमल थेटे ( उत्कृष्ट रांगोळी महिला आर्टिस्ट), सुनिता नाथा शिंनगारे (उत्कृष्ट आशा वर्कर) या विविध क्षेत्रातील महिलांचा सोमवारी सकाळी ११ वाजता आष्टी पंचायत समिती सभागृहात महिला दिनानिमित्ताने शाल, श्रीफळ, सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व फेटा बांधून नारी सन्मान २०२५ हा पुरस्कार देऊन आष्टी तालुका युवा पत्रकार संघ गौरव करणार आहे.

## लोकमान्य टिळक विद्यालयात महिला दिन उत्साहात साजरा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

पोखरी येथील लोकमान्य टिळक विद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानेश मातेकर, प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती वनमाला बनाळे उपस्थित होत्या.याप्रसंगी बोलताना बनाळे ताई म्हणाल्या की, जागतिक महिला दिन साजरा करतांना महिलांना समाजात समानतेच्या संधी मिळणे आवश्यक असून महिलांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न झाले पाहिजेत.महिलांनी आपल्या मुलींच्या शिक्षणासाठी प्रयत्न केला तर त्या स्वयंपुर्णतेकडे वाटचाल करतील असे मत व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोपात ज्ञानेश मातेकर म्हणाले की, जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आपण भारत देशातील कर्तृत्ववान महिलांच्या कार्याचे स्मरण केले पाहिजे.प्राचिन मध्ययुगीन ते आधुनिक भारताच्या इतिहासात अनेक कर्तृत्ववान महिलांनी इतिहास घडवला आहे, त्यांच्या कार्याची दखल घेतली पाहिजे.याची नोंद क्रमिक अभ्यासक्रमात झाली पाहिजे तरच त्यांचा आदर्श घेऊन भावी पिढी मार्गक्रमण करतील असा विश्वास व्यक्त केला.



जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने विद्यालयात पोखरी गावातील आशा ताई व ग्रामपंचायत सदस्या यांचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी गावातील माता पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्रीमती प्रणिता धोंड,तर आभार प्रदर्शन शांती मंत्र राकेश मोरे यांनी केले.यावेळी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.या कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनींनी उत्साहाने सहभाग घेतला होता.

## जगाच्या इतिहासात राष्ट्र उभारणीत महिलांचे योगदान महत्त्वाचे -प्रा.सोमनाथ घाडगे

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व महिला तक्रार निवारण समितीच्या वतीने प्राचार्य डॉक्टर विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे मा प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर च्या आधी सभा सदस्य डॉक्टर प्राध्यापिका कल्पना घारगे मॅडम महाविद्यालयाच्या ग्रंथपाल प्राध्यापक सौ रकटे मॅडम हिंदी विभागाचे डॉक्टर वंदन जाधव प्रा डॉ अशोक देवगुडे सर व सौ नाईक नवरे मॅडम उपस्थित होत्या मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली उपस्थित मान्यवरांचा विभागाच्या वतीने सत्कार करण्यात आला यानंतर या कार्यक्रमाचे प्रस्तावित कार्यक्रमाधिकारी डॉक्टर लोखंडे बी बी यांनी केले या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना ग्रंथपाल सौ प्र रकटे मॅडम यांनी आपले मनोगत व्यक्त करताना महिलांना आरंभीच्या काळात कोणत्याही प्रकारचे शैक्षणिक सामाजिक राजकीय अधिकार नव्हती स्वातंत्र्यानंतर या अधिकाराची जाणीव करून देण्यासाठी आज जगाच्या पातळीवर हा दिवस साजरा करण्यात येतो व महिलाचा सन्मान करण्यात येतो असे मनोगत व्यक्त केले तर विद्यापीठ आधी सभा सदस्य प्राध्यापक डॉक्टर घारगे मॅडम यांनी आपले मनोगत व्यक्त करताना समाजातील अनेक यशस्वी महिलांची यशोगाथा सांगून मुलींनी आत्मसन्मानासाठी समोर येण्याचे मनोगत व्यक्त केले तर अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना समाजातील महिलांचे स्थान याविषयी आपले मनोगत व्यक्त करून फार पूर्वी काळापासूनच जगाच्या इतिहासात महिलांचा सन्मान केला जातो महिलांचे नेतृत्व अगदी प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे इतिहासात राष्ट्रवादीत महिलांचे योगदान अतिशय महत्त्वाचे असल्याचे मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमात महाविद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी आकांक्षा मकाल यांनी आपले मनोगत व्यक्त करून सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या जीवनावर गीत गायले कुमारी निकिता भोसले आणि कुमारी प्रांजली वी व यांनी आपले मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी वार भवन प्रज्ञा हिने केले तर आभार कुमारी प्रांजली वीर हिने मांडले या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री कुणाल काळे व दत्ताचे आदर यांनी परिश्रम घेतले




## स्त्रियांनी स्वत:मधील शक्तीना ओळखून कार्यप्रवण व्हावे -डॉ प्रज्ञा जोशी

माजलगाव । प्रतिनिधी

येथील भा शि प्र संस्था अंबाजोगाई संचलित श्री सिद्धेश्वर महाविद्यालय व अंतर्गत तक्रार निवारण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी प्रख्यात स्त्रीरोग तज्ञ डॉ प्रज्ञा जोशी, कार्यक्रमाचे अध्यक्ष संकुलाचे पालक व संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रकाश दुगड तसेच प्रमुख उपस्थिती केंद्रीय सदस्य अमरनाथ खुर्पे,प्राचार्य डॉ मुकुंद देवर्षी,प्रा. श्रीमती डॉ साधना घडसिंग,प्रा.प्रतिभा जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.



प्रमुख मार्गदर्शक डॉ प्रज्ञा जोशी म्हणाल्या की, महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी आजच्या २१ व्या शतकात स्वतः सक्षम होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. स्वतःमधील कौशल्य व शक्ती ओळखली पाहिजे. तरच जागतिक महिला दिन सार्थकी लागल्यासारखे आहे.

या प्रसंगी संस्थेचे केंद्रीय सदस्य अमरनाथ खुर्पे यांनी आता तरुणींनी काळाप्रमाणे शिक्षणाचा जागर करत शासनाच्या उपक्रमांचा फायदा घेत स्वतः सोबत सर्वांना सक्षम बनवले पाहिजे. असे म्हणाले.कार्यक्रमाचे अध्यक्ष व संकुलांचे पालक प्रकाश दुगड यांनी मुलींनी राजमाता जिजाऊ, अहिल्यादेवी होळकर यांचे चरित्र आवर्जून वाचले पाहिजे यातून त्यांना स्वतःला घडविण्याची दिशा मिळेल असे म्हटले. आणि सर्वांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. प्रातिनिधीक स्वरूपात महाविद्यालयातील दहा विद्यार्थिनींना बुटाचे वाटप करण्यात आले. त्यानंतर महाविद्यालयातील सर्व कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील सर्व विद्यार्थिनींना शूज (बूट ) चे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. प्रीती कळसणे यांनी केले कार्यक्रमाचा उद्देश व भूमिका विशद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मनीषा सरकटे यांनी केले तर आभार प्रा.स्वाती साखरे यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व महिला कर्मचाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी,महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड,उपप्राचार्य डॉ.गजानन होन्ना, डॉ.युवराज मुळये, प्रा.अंकुश साबळे, पर्यवेक्षक परमेश्वर खेत्री,डॉ.प्रेमनंदा घडसिंग,प्रा.मंदा मस्के,श्रीमती स्वाती धर्माधिकारी, प्रा.प्रतिभा जाधव तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## कै.लोढा विद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात

चौसाळा । प्रतिनिधी

कै.चांदमलजी लोढा विद्यालयात ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून संस्थेच्या अध्यक्षा सौ संगीता अशोक लोढा तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉक्टर अनिता पोथरकर ज्योत्स्ना मोटे ,डॉक्टर ऐश्वर्या मंचुके, सौ.जयश्री भोसले श्रीमती संध्या पंडित जोगदंड श्रीमती जयश्री हुलजुते मंचावर उपस्थित या मान्यवरांनी दीपप्रज्वलन व भारतीय महिलांचे दीपस्तंभ असणाऱ्या कर्तुत्ववान महिलांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.शाळेच्या वतीने कार्यक्रमास उपस्थित सर्व सन्माननीय महिलांचा सन्मान करण्यात आला.स्वागत गीताने या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती पूजा सोनवणे यांनी केले .शाळेतील महिलांनी सर्वांची काळजी घेत असताना स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नये शारीरिक व मानसिक स्वास्थ्याची काळजी घ्यावी असे प्रतिपादन प्रमुख पाहुण्या डॉक्टर अनिता पोथरकर यांनी याप्रसंगी बोलताना केले. जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी घरातून मुलींना योग्य प्रोत्साहन द्यायला हवे असे मत डॉक्टर ऐश्वर्या मनसुके यांनी याप्रसंगी व्यक्त केले.योग्य प्रोत्साहन,स्वातंत्र्य,पुढे जाण्याची समान संधी ही मुलींना स्वावलंबी बनवते असे मत याप्रसंगी बोलताना डॉक्टर ज्योत्स्ना मोटे यांनी व्यक्त केले.अध्यक्षीय समारोपात उपस्थितांना मार्गदर्शन करताना करताना संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती संगीता अशोक लोढा यांनी मुलींनी स्वसंरक्षणासाठी प्रशिक्षणाचे धडे घेऊन नेहमी सज्ज राहावे,तसेच कुटुंबाने व समाजाने पुढे जाणाऱ्या महिलांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहणे गरजेचे आहे असे प्रतिपादन याप्रसंगी बोलताना केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विभाग प्रमुख सचिन महामुनी यांनी केले तर सर्व उपस्थितांचे आभार श्रीमती शिल्पा वाघमारे यांनी मानले. या कार्यक्रम प्रसंगी विद्याताई बळीराम राऊत, वैशाली जोगदंड, शोभा नाडे, काशीबाई जाधव, उषा काळे, अश्विनी सोनवणे, भाग्यश्री शिंदे, मनीषा ढोकणे, गीता सोनवणे, विद्या वाघमारे, प्रीती शेटे, उषा संजय सोनवणे, माया विधाते, दिलशाद आतार, पूजा साळुंखे, मुनावर शेख, सना बागवान, अनिता मोरे, शैला सोनवणे, गीता सोनवणे, अंगणवाडी सेविका सरला बारवकर, उषा पवार, सविता ढोकणे, निर्मला औताडे, विद्या लिंगे, जयश्री गिरे, शोभा विधाते, प्रतीक्षा गायकवाड, जकिरा मुजावर, मिनाज बेग, संगीता पारवे, हिराबाई गाडेकर, सुनिता काळे, आशा वर्कर पवार पुष्पा, शोभा भगत, मनीषा मुंडे यांची उपस्थिती होती.कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक रिठ्ठे सर, शाळेचे ज्येष्ठ शिक्षक श्री खाकरे सर, तावरे सर, तांदळे सर, वाघ सर, राऊत सर, जाधव सर, माध्यमिक विभागाचे पवार सर, उमेश खाकरे सर, शेख सर, भवर मॅडम, काळे ताई यांनी परिश्रम घेतले.

## अनिषा शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाने आष्टीकरांची मने जिंकली

### महाभारत,शेतकरी व्यथा,शिव तांडव,सोशल मिडियाचे सादरीकरण ठरले लक्षवेधी

आष्टी । प्रतिनिधी

**महाभारतातील श्रीकृष्ण जन्म, द्रौपदीचे वस्त्रहरण,युद्धभूमीवरील सादरीकरण तसेच सद्यस्थितीत शेतकऱ्यांच्या समस्या,सोशल मिडीयाचा होणारा अती वापर आणि त्यातून विद्यार्थ्यांची बदलत चाललेली मानसिकता यासह विविध नृत्य, संगीत, नाटक आणि इतर कला प्रकार सादर करत आष्टी शहरातील अनिषा ग्लोबल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आष्टीकरांची मने जिंकली.**

शहरातील पिंपळेश्वर देवस्थान संचलित अनिशा ग्लोबल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन शुक्रवारी सायंकाळी ६ ते १० या वेळेत संपन्न झाले. या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन उपविभागीय अधिकारी वसीमा शेख, गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव,संचालक ह.भ.प.रामदास डोरले महाराज,सुखलाल मुथा,प्रा.लक्ष्मण रेडेकर,संजय मुळे, सौ. प्राजक्ता धस यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून दुरावत चाललेली माणसे त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या आणि सोशल मीडियाच्या जाळ्यात अडकत जाणारी तरुणाई यावर प्रकाश टाकत सामाजिक संदेश देत कुटुंबातील वाढत असलेला विसंवाद याला सोशल मीडिया कशा पद्धतीने कारणीभूत आहे,हे विद्यार्थ्यांनी त्यांच्या नाटीकेतून सादर केले. तर सद्यस्थितीत शेतमालाला मिळणारा बाजार भाव,अवकाळी,गारपीट यासह अन्य कारणांनी पिकांचे होणारे नुकसान त्यामुळे कर्जबाजारी होत चाललेल्या शेतकऱ्यांच्या व्यथा सादरीकरणाने उपस्थितांच्या डोळ्यात पाणी आले. शिव तांडव नृत्याने,तर चिमुकल्यांच्या नव नवीन कला आणि संस्कृतींचा परिचय करून देत त्यांच्यातील कलात्मक क्षमतांनी उपस्थितांची वाहवा मिळवली.या कार्यक्रमासाठी शाळेच्या सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.



## महाबोधी बौद्ध विहारासाठी निदर्शने

### निदर्शनास उपस्थित राहण्याचे रिपाइंचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

बिहार राज्यातील बोधगया येथील महाबोधी बौद्ध विहार कायदा १९४९ रद्द करुन महाबोधी बौद्ध विहार बौद्ध समाजाच्या ताब्यात देण्यात यावे. या मागणीसाठी रिपाइंकडून बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोमवार (दि.१०) मार्च रोजी सकाळी ११ वाजता निदर्शने केली जाणार आहेत. सदरील निदर्शने रिपाइंचे अध्यक्ष तथा सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले, युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली केली जाणार आहेत. या निदर्शनास रिपाइं पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.



प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हंटले आहे की, महाबोधी बौद्ध विहारास जागतिक वारसा स्थान म्हणून मान्यता मिळालेली आहे. शाक्य वंशाचे राजकुमार सिद्धार्थ गौतमांना या ठिकाणी पूर्णज्ञान (संबोधी/बुद्धत्व) प्राप्ती होऊन ते सम्यक संबुद्ध' बनले, व 'बुद्ध' म्हणून सर्वत्र ओळखले जाऊ लागले.असे असतांना तेथील बौद्ध विहाराचा ताबा हा हिंदूकडे आहे.त्यामुळे हे बौद्ध विहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे.यासाठी जगभरातील बौद्ध धम्मीय बिहार येथील बौधगया येथे एकत्रित आलेले आहेत. त्या अनुषंगाने देशात आणि राज्यात रिपाइं अध्यक्ष मंत्री रामदास आठवले, युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पु कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली निदर्शने केली जात आहेत. बीडमध्ये सोमवारी निदर्शने होवून, त्यानंतर तालुका पातळीवरही निदर्शने केली जाणार आहेत. त्यामुळे बीड येथील निदर्शनास रिपाइं पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन राजू जोगदंड, किसन तांगडे, महेश आठवले,बापू पवार,शाहू डोळस, अविनाश जोगदंड,मायाताई मिसळे,प्रभाकर चांदणे, ज्ञानोबा माने, सुभाष तांगडे, विलास जोगदंड, भैय्यासाहेब मस्के,महेंद्र वडमारे, अक्षय कोकाटे, मनोज बोराडे, धम्मा पारवे,संजय हनवते,सचिन वडमारे,शाम वीर, गणेश वाघमारे, नामदेव वाघमारे बाप्पा जावळे, अनिता डोंगरे, रेश्माताई जोगदंड, आनिताताई डोंगरे आदींनी केले आहे.

पान ६ वरून...

### सुंदरराव सोळंके महाविद्यालयात

सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी प्राचार्य डॉ.जी.के. सानप,उपप्राचार्य डॉ.एम.ए.कव्हळे, पर्यवेक्षक प्रा.एम. के.अलझेंडे, प्रा.सुदर्शन स्वामी,प्रा. संजय बागुल यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी महाविद्यालयातील महिला प्राध्यापिका व महिला कर्मचाऱ्यांचा सत्कार प्राचार्य डॉ. जी. के.सानप यांच्या हस्ते करण्यात आला.याप्रसंगी डॉ.अर्चना कचरे, प्रा.वैशाली शहाणे, प्रा.संगीता शेजुळ,प्रा.नमिता वडमारे,श्रीमती मिना डक,श्रीमती जी. व्ही.मुसळे,अनिता पवार आदींची उपस्थिती होती.

### प्रमोद महाजन इंग्लिश स्कूलमध्ये

मेळाव्यासाठी शुभेच्छा दिल्या.

बाल आनंद मेळाव्यामध्ये एकूण ८० स्टॉल विद्यार्थ्यांनी लावले होते प्रत्येक स्टॉलवर विविध प्रकारचे रुचकर,स्वादिष्ट,चवदार पदार्थ कचोरी,वडापाव,इडली,टरबुज,लिंबू शरबत,मट्टा,पाणीपुरी,भेळ इत्यादी प्रकारचे पदार्थ विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने तयार करून विक्रीस ठेवले होते या आनंद मेळाव्यातून सुमारे १५००० ते २०००० रुपयांची उलाढाल झाली.

या बाल आनंद मेळाव्यातील स्टॉल धारक विद्यार्थ्यांना प्रमोद महाजन इंग्लिश स्कूल मधील सौ.प्रियंका कुरकुटे,सौ.शितल लाटणे,सौ.नितल कुरकुटे,सौ.फासे मॅडम यांच्यासह इंग्लिश स्कूल मधील सर्व शिक्षिकेने मार्गदर्शन व मदत केली.या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने इंग्लिश स्कूल मधील विद्यार्थी तसेच पालक,शिक्षक शिक्षिका,विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहून त्यांनी बाल आनंद मेळाव्याचा आनंद घेतला.

# आयातीला मुदतवाढ देऊन हरभऱ्याचे भाव सरकार पाडणार का?

## पिवळा वाटाणा आयातीला मुदतवाढीवरून संभ्रम

पुणे : कस्टम विभागाने पिवळा वाटाण्याच्या मुक्त आयातीला ३१ मे २०२५ पर्यंत मुदतवाढ दिल्याची अधिसूचना काढली. त्यामुळे हरभऱ्याचे भाव पडण्यासाठी कारणीभूत ठरलेल्या पिवळा वाटाणा आयातीला मुदतवाढ दिल्याची सध्या चर्चा आहे. मात्र आयातीसंदर्भातील अधिसूचना व्यापार आणि उद्योग विभागाच्या विदेश व्यापार महासंचालनालयाने काढली तरच मुक्त आयातीला मुदतवाढ मिळाल्याचे स्पष्ट होईल. पण तशी अधिसूचना आतापर्यंत तरी काढलेली नाही.

विदेश व्यापाराविषयी धोरण बदलल्यास व्यापार आणि उद्योग विभागाच्या विदेश व्यापार महासंचालनालय अधिसूचना काढत असते. ही अधिसूचना कस्टम विभागाकडे गेल्यानंतर आयात - निर्यात कर लागू होतो. पण आता पिवळा वाटाणा आयातीला ३१ मे २०२५ पर्यंत मुदतवाढ दिल्याची अधिसूचना वित्त विभागाच्या कस्टम विभागाने काढली आहे. तरीही भारत सरकारच्या कस्टम विभागाने अधिसूचना काढल्यामुळे संभ्रम निर्माण झाला आणि पिवळा वाटाणा आयात पुन्हा मुक्त केली, अशी चर्चा बाजारात सुरु झाली. पण मुदतवाढीसंदर्भात अधिसूचना व्यापार आणि उद्योग मंत्रालयाच्या विदेश व्यापार महासंचालनालयाकडून निघायला हवी. मात्र ती निघाली नाही. त्यामुळे मुक्त वाटाणा आयातीची मुदत २८ फेब्रुवारीलाच संपली आहे. कारण त्यानंतर आयात शुल्काविषयी कोणतीही अधिसूचना विदेश व्यापार महासंचालनालयाने काढली नाही. त्यामुळे पिवळा वाटाणा आयातीसाठी जुने धोरण लागू झाले. जुन्या धोरणानुसार पिवळा वाटाणा आयातीवर २०० रुपये प्रतिकिलो किमान आयात मूल्य आणि ५० टक्के आयात शुल्क लागू आहे. मग कस्टम विभागाने अधिसूचना काढली त्याचा अर्थ काय? तर जाणकारांनी सांगितले की, पिवळा वाटाणा मुक्त आयातीला २८ फेब्रुवारीपर्यंतच मुदत होती. म्हणजेच २८ फेब्रुवारीपर्यंत आयातीचे व्यवहार सुरु होते. कस्टम विभागाच्या अधिसूचनेनुसार २८ फेब्रुवारीपर्यंतच आयातीसाठी जहाजांवर भरलेला माल देशात आयात करण्यालाच मुदतवाढ मिळाली, असे बाजारातील अभ्यासकांनी सांगितले. म्हणजेच आयातीसाठी नविन सौदे करून आयात करण्याला मुक्त आयातीचा नियम लागू होणार नाही. १ मार्चपासून जहाजांवर भरला जाणार माल आणि आयात होणाऱ्या मालावर २०० रुपये प्रतिकिलो किमान आयात मूल्य आणि ५० टक्के आयात शुल्क लागू आहे. विदेश व्यापार महासंचालनालय जोपर्यंत नविन अधिसूनचा काढून आयात शुल्क किंवा किमान आयात मूल्याविषयी निर्णय घेत नाही, तोपर्यंत हेच धोरण लागू राहील, असेही अभ्यासकांनी सांगितले.



## ट्रॅक्टर खरेदीसाठी शेतकऱ्यांना सरकार देतेय ३.१५ लाखांचे अनुदान



शेतकऱ्यांसाठी सरकार विविध योजना राबवत असते, ज्यामुळे त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ घेता येतो. त्यापैकी ट्रॅक्टर अनुदान योजना ही एक महत्वाची योजना आहे. शेतकऱ्यांना मिनी ट्रॅक्टर खरेदीसाठी या योजनेमार्फत अनुदान दिले जाते. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना ३.१५ लाख रुपयांपर्यंतचे अनुदान मिळू शकते.

ट्रॅक्टर अनुदान योजना माहिती :

ट्रॅक्टर अनुदान योजना ही शेतकऱ्यांना मिनी ट्रॅक्टर आणि त्याच्या उपसाधनांच्या खरेदीसाठी अनुदान देण्याची योजना आहे. या योजनेत ९०% अनुदान दिले जाते, ज्यामुळे शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ घेता येतो. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना बचत गट तयार करावा लागतो. ही योजना शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी महत्वपूर्ण आहे.

आवश्यक कागदपत्रे : शेतकऱ्याचे आधार कार्ड, जमीनीचा ७/१२ उतारा, बँक पासबुकची प्रत, आयकर प्रमाणपत्र (लागू असल्यास),

अनुदानाची रक्कम : या योजनेतून शेतकऱ्यांना ३.१५ लाख रुपयांपर्यंतचे अनुदान मिळू शकते. ही रक्कम थेट बँक खात्यावर जमा केली जाते.

ट्रॅक्टर अनुदान योजनेला कसा अर्ज करायचा? : अर्ज प्रक्रिया - अर्ज करण्यासाठी खालील स्टेप्स फॉलो कराव्यात. प्रथम गुगल प्ले स्टोअरवरून हॅलो कृषी नावाचे मोबाईल अँप डाउनलोड करून घ्यावे. अँप ओपन करून होम स्क्रीन वर असलेल्या सरकारी योजना यावर क्लिक करून ट्रॅक्टर अनुदान योजना निवडावी. माहिती वाचून अर्ज करा. आता समोर ओपन झालेल्या फॉर्ममध्ये सर्व माहिती भरून राजिट्रेशन करावे.

पात्रता - या योजनेसाठी अर्ज करण्यासाठी शेतकऱ्यांना काही पात्रता निकष पूर्ण करावे लागतात. त्यात शेतकऱ्यांनी किमान २ हेक्टर जमीन असणे आवश्यक आहे.

अनुदानाची प्रक्रिया : अनुदानाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, अनुदानाची रक्कम थेट शेतकऱ्याच्या बँक खात्यावर जमा केली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना ट्रॅक्टर खरेदीसाठी आर्थिक मदत मिळते.

## शेततळ्यासाठी जागा निवडताना या बाबींचा विचार करा

शेततळ्याचा मुख्य उद्देश म्हणजे पावसाचे वाहून जाणारे पाणी साठविणे आणि त्याचा वापर ज्या वेळी पिकाला पावसाची किंवा पाण्याची गरज असेल त्यावेळी संरक्षित पाणी देण्यासाठी केला जावू शकतो. तसेच वर्षभर लागणाऱ्या पाण्याचा वापर देखील शेततळ्याच्या माध्यमातून केला जाऊ शकतो. शेततळ्याच्या कार्यक्षम वापर व त्यातील पाण्याचा चांगला वापर करण्यासाठी शेततळ्याच्या बांधणी पासून विशिष्ट बाबींचे नियोजन करणे महत्त्वाचे असते. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे जागेची निवड. जेथे सहजासहजी विहीर खोदणे शक्य होत नाही तेथे वाहून जाणारे पाणी साठविण्यासाठी शेततळे तयार करून पाणी साठविता येते. पावसाच्या अनियमितपणामुळे जेव्हा पावसाअभावी पिकास ताण पडतो, अशा वेळी या तळ्यात साठविलेल्या पाण्यामधून एक किंवा दोन पाणी पिकास देऊन उत्पादन वाढण्यास मदत होऊ शकते. काही क्षेत्र रब्बी पिकाखालीही आणता येऊ शकते. जमिनीतील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी, मत्स्य उत्पादनासाठी, पिण्यासाठी, घरगुती उपयोगासाठी व जनावरांना पाणी पिण्यासाठी शेततळ्याचा उपयोग होऊ शकतो. ज्या ठिकाणी जमीन जवळ जवळ सपाट असेल त्या ठिकाणी खड्डा खोदून तळे तयार करावे, तर काही ठिकाणी नैसर्गिक घळ अथवा ओघळ अडवून किंवा नाला शेताजवळून वाहत असल्यास त्याला आडवून शेततळ्यात पाणी साठवता येते.

शेततळ्यासाठी जागेची निवड : १) शेततळ्यासाठी ज्या क्षेत्रातून पावसाचे वाहून जाणारे पाणी येणार असेल त्या क्षेत्राचा उतार जवळपास चार टक्क्यांपर्यंत असावा. घळीला आडवा भराव घालून शेततळे तयार करणार त्याच्या वरच्या बाजूला घडीला चार ते सहा टक्के पर्यंत उतार असावा. म्हणजे तळ्यात साठवल्या जाणाऱ्या पाण्याला खोली जास्त मिळेल. २) शेतीचा क्षेत्राचा विचार केला असता शेतात एका ठिकाणी पावसाचे पाणी गोळा होईल अशी जागा शेततळ्यासाठी निवडावी. म्हणजेच पृष्ठभागावरून मिळणारा अपधाव शेत तळ्यामध्ये साठवला जाईल.

३) शेततळ्याची जागा निवडताना अशी निवडावी की, खोदायचा होणारा खर्च हा कमीत कमी होईल. शेततळ्यासाठी पाणी साठवणूक घनता आणि मातीकाम घनता यांचे गुणोत्तर एक पर्यंत असावे तर घळीला आडवा भराव घालून केलेल्या शेततळ्यासाठी हेच गुणोत्तर पाच ते दहा पर्यंत असावे. ४) शेततळ्याच्या साठलेल्या पाण्याचा पुनर्वापर सोयीस्कर करता येईल असे ठिकाण निवडावे. ५) शेततळ्याच्या आराखडा शेतातून मिळणाऱ्या पावसाचे वाहून जाणारे पाणी वर आधारित असावा किंवा शेतकऱ्यांची वर्षभरातील पाण्याची गरज किती आहे.संपूर्ण पावसाचे वाहून जाणारे पाणी साठवणे शक्य नाही त्या ठिकाणी हा विचार करावा त्यानुसार शेतकऱ्याची आखणी करावी. ६) शेततळयातून साठवलेले पाणी बाष्पीभवन आणि झिरपण्याद्वारे जाणार याचा अंदाज करून शेततळ्याचा आराखडा तयार करावा. जमिनीचा उतार आणि उपलब्ध पाण्याचा स्त्रोत अनुसार क्षेत्राचे प्रकार पडतात. ७) शेततळे तयार करताना त्यात येऊ शकणारी एकूण पाणी, शेततळे ज्या जागेवर तयार करायचे आहे तेथील जमिनीचा प्रकार, पाण्याची एकूण गरज, बाष्पीभवनाद्वारे होणारा पाण्याचा व्यय या गोष्टींचा विचार करणे अत्यंत गरजेचे आहे.



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५७६ : साली मेवाड शासक महाराणा प्रताप आणि मुघल शासक बादशाहा अकबर यांच्यात हल्दीघटीचे युद्ध झाले.
१६५३ : साली विश्वविख्यात जागतिक वारसा स्थळांच्या यादीत नोंदल्या गेलेली ऐतिहासिक वास्तू ताजमहल ची निर्मिती जवळपास २२ वर्षानंतर पूर्ण झाली
१८७४ : मुंबईत प्रथम घोड्यांची ट्राम सुरु झाली.
१८७७ : पेरू देशाच्या किनारपट्टीवरील झालेल्या ८.८ तीव्रतेच्या भूकंपामुळे २५४१ लोक ठार झाले.
१९०४ : वाफेवर चालणारे सिटी ट्रुरो हे इंजिन १६० किमी / ताशी पेक्षा जास्त वेगाने धावणारे यूरोपमधील पहिले इंजिन बनले.
१९३६ : इटलीने इथिओपिया देश बळकावला.
१९५५: पश्चिम जर्मनी देशाचा नाटो मधे प्रवेश.
१९७५ : विजेवर चालणारी टंकलेखन मशीन तयार करण्यात आली
१९९९ : अटलांटा ग्रांप्री नेमबाजी स्पर्धेत भारताच्या रुपी उन्नीकृष्णनने प्रोन गटात रौप्यपदक पटकाविले.
१९९९ : ग्वाटेमालाच्या ज्युलिओ मार्टिनेझ याने ग्रॅन्ड प्रिक्स स्पर्धेतील वीस किलोमीटर चालण्याची शर्यत १ तास १७ मिनिटे व ४६ सेकंदात पूर्ण करुन नवा जागतिक विक्रम प्रस्थापित केला.
२००३ : अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपनी गुगलने इंटरनेट प्रोग्राम एड्सेंस सादर केला.
२००९ : अमेरिकन अंतराळ संस्था नासाने चंद्रावर पाण्याचा शोध लावण्यासाठी आपला टोही नावाचा उपग्रह प्रक्षेपित केला.
२०१२ : अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्रपती बराक ओबामा यांनी समलैंगिक विवाह करण्यास आपली अनुमती दिली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५४० : मेवाडचा प्रसिध्द वीरपुरुष महाराणा प्रताप.
१८१४ : दादोबा पांडुरंग तर्खडकर, इंग्लिश व्याकरणकार, ग्रंथकार
१८३६ : फ्रेंच नेत्र रोग विशेषज्ञ फर्डिनेंड मोनॉयर यांचा जन्मदिन.
१८६६ : गोपाळ कृष्ण गोखले, भारतीय स्वातंत्र्यसेनानी, मराठी समाजसुधारक.
१८८६ : स्वातंत्र्यसैनिक, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील एक प्रमुख नेते, शेतकरी कामगार पक्षाचे एक संस्थापक केशवराव मारुतराव जेधे यांचा जन्म. (मृत्यू: १२ नोव्हेंबर १९५९ पुणे)
१८९६ : थोर स्वातंत्र्यसैनिक, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील प्रमुख नेता व शेतकरी कामगार पक्षाचे संस्थापक केशवराव मारुतराव जेथे यांचा जन्मदिन.
१९२८ : वसंत नीलकंठ गुप्ते, मराठी कामगार चळवळ कार्यकर्ते, लेखक.
१९३५ : सुप्रसिद्ध भारतीय हिंदी कवयित्री स्नेहमयी चौधरी यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३३८ : भगवद्भक्त चोखा मेळा हा मंगळवेढे येथील गावकुस बांधत असताना कोसळणार्या कुसबाखाली सापडला.
१९१७ : डॉक्टर, कवी व शास्त्रज्ञ कान्होबा रणझोडदास यांचे निधन.
१९१९ : रेव्हरंड नारायण वामन टिळक यांचे निधन. (जन्म: ६ डिसेंबर १८६१)
१९३१ : वर्णपटाद्वारे प्रकाशाच्या मापनासंबंधीच्या शोधासाठी नोबेल पारितोषिक मिळवणारे जर्मन-अमेरिकन पदार्थवैज्ञानिक अल्बर्ट मायकेलसन यांचे निधन. (जन्म: १९ डिसेंबर १८५२)
१९५९ : थोर शिक्षणतज्ज्ञ डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे निधन. (जन्म: २२ सप्टेंबर १८८७)
१९५९ : साली दक्षिण आफ्रिकेतील हिंदी विषयाचे प्राध्यापक व महात्मा गांधी यांचे निकटवर्तीय तसचं, राष्ट्रवादी, हिंदी आणि आर्य सामाजीक भारतीय स्वामी भवानी द्याल संन्यासी यांचे निधन.
१९८६ : एवरेस्ट शिखर सर करणारा शेरपा तेलसिंग नोर्गे यांचे निधन. (जन्म: २९ मे १९१४)
१९९५ : दिग्दर्शक अनंत माने यांचे निधन. (जन्म: २२ सप्टेंबर १९१५)
१९९८ : पार्श्वगायक व अभिनेता, गझलचे बादशहा तलत महमूद यांचे निधन. (जन्म: २४ फेब्रुवारी १९२४ लखनौ, उत्तर प्रदेश)
१९९९ : उद्योगपती करमसीभाई जेठाभाई सोमय्या यांचे निधन.
२००४ : चेचेन्या येथे झालेल्या विस्फोटात तेथील राष्ट्रपती अखमद कादरोव यांचे निधन.
२००८ : किराणा घराण्याचे शास्त्रीय गायक पं. फिरोझ दस्तूर यांचे निधन.
२०१४ : भारतीय राजकारणी नेदुरुमल्ली जनार्दन रेड्डी यांचे निधन. (जन्म: २० फेब्रुवारी १९३५)

## सेंद्रिय घटक वाढवण्याचा सर्वात सोपा मार्ग

अलीकडच्या काळात अनेक शेतकरी सेंद्रिय शेतीकडे वळताना दिसत आहेत. सेंद्रिय शेती मधून येणाऱ्या पिकाला बाजारात भावसुद्धा चांगला मिळत असल्याने यावर भविष्यात मागणी वाढण्याची शक्यता आहे. सेंद्रिय शेतीसाठी जमिनीतील सेंद्रिय घटक फार महत्वाची भूमिका पार पाडतात. जमिनीतील हे सेंद्रिय घटक कसे वाढवायचे याबाबत माहिती जाणून घेण्याची गरज आहे.

उष्ण हवा आणि कमी पाऊस यांमुळे अधिकतर क्षेत्रातील सेंद्रिय घटकांचे भस्मीकरण जलद गतीने होते. सेंद्रिय भागाचे विघटन व भस्मीकरण होणे ही बाब महत्त्वाची आहे. पण उष्ण हवेत ही प्रक्रिया फार जलद होते. त्यामुळे सेंद्रिय घटक तयार होण्याच्या क्रियेत समतोलपणा राहत नाही. हा समतोलपणा येण्यासाठी खालील उपायांचा अवलंब करावा.

१) जमिनीस अधिक प्रमाणात सेंद्रिय खते किंवा भरखते पुरविली पाहिजेत. भरखते ही एकाच वेळी भरपूर प्रमाणात न देता ती प्रत्येक पिकास टप्प्याटप्प्याने परंतु नियमितपणे द्यावीत. २) जमिनीतील सेंद्रिय घटक नैसर्गिक हवामान बदलावर अवलंबून असल्याने त्याचे प्रमाण वाढविणे अशक्यप्राय आहे. परंतु त्याचा समतोल राखला जाईल यासाठी कंपोस्ट खत, शेणखत, पालापाचोळा, पिकांचे अवशेष वगैरेंचा वापर करावा. ३) धैंचा, ताग, शेवरी, बरबडा तसेच पार्थेनियम यासारख्या हिरवळीच्या खतांची लागवड करून ती पिके फुलोऱ्यात येताच जमिनीत गाडावीत. हिरवळीची पिके पेरताना व नांगरून टाकताना फॉस्फेटयुक्त खते द्यावीत किंवा हिरवळीचे पीक गाडल्यानंतर घेण्यात येणाऱ्या पिकांच्या स्फुरदाची खत मात्रा हिरवळीच्या खतात द्यावी. ४) कडधान्यवर्गीय गवते उदा. टाकळा, तरवड, बरबडा फुलोऱ्यात येण्यास सुरुवात होत असताना अथवा पार्थेनियमसारखी पिके फुलोऱ्यापूर्वी शेतात गाडल्यास त्यापासूनही जमिनीमध्ये सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढविता येते. ५) सुबाभूळ अथवा गिरीपुष्प यांसारखी झाडेसुद्धा बांधावर लावून त्यांची एक मीटरवर वारंवार छाटणी करून त्यांच्या कोवळ्या फांद्या शेतात नुसत्या पसरल्या तरीही त्यांचा तिहेरी फायदा होतो. पहिला फायदा जमिनीवर आच्छादन करता येते. त्यामुळे पावसाच्या थेंबाने होणारी मातीची धूप थांबविता येते. तसेच जमिनीत जास्त पाणी मुरविता येते व बाष्पीभवनामधून उडून जाणाऱ्या पाण्याचे संवर्धन करता येते. तसेच या फाद्यांचे कर्ब- नत्राचे गुणोत्तर कमी असल्यामुळे त्याचे दीड ते दोन महिन्यांत भस्मीकरण होऊन पुढील पिकास अन्नद्रव्यांचा चांगला पुरवठा होतो व रासायनिक खताची मात्रा कमी करता येते. भस्मीकरणाची क्रिया सावकाश करण्यासाठी जमिनीवर पालापाचोळ्याचा थोडा जास्त थर राहू द्यावा, यालाच इंग्रजीत ऑरगॅनिक मल्च (सेंद्रिय आच्छादन) असे म्हणतात. ६) जमिनीची कमीत कमी मशागत केल्यास सेंद्रिय पदार्थाचा ऱ्हास होत नाही.

एकंदरीत जमिनीतील सेंद्रिय घटक हे पीक उत्पादनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत व त्याची घट वरचेवर भरून काढणे अत्यावश्यक आहे. ज्या शेतीमध्ये जमिनीतील सेंद्रिय घटकांचे प्रमाण कमी होत जाते ती शेती किफायतशीर होऊ शकत नाही. शेतकऱ्यांनी याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.



# पाझर तलावासाठी संपादीत जमिनीवर पवनचक्कीचे उपकेंद्र कारवाईस टाळाटाळ

## मावेजा मागणाऱ्या शेतकऱ्यांला दिवसभर पोलिसांनी डांबुन ठेवले | पाटोदा तालुक्यातील बेनसुर येथील धक्कादायक प्रकार

पाटोदा। प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील धनगरजवळका येथे पाझर तलाव क्रमांक ७ साठी सर्व्हे गट नंबर ८ मधील संपादीत केलेल्या जमिनीवर पवनचक्की द्वारे निर्मित वीजेसाठी जवळपास ५ कोटी रुपये खर्चून सरकारी जमिनीवर २२० केव्ही चे उपकेंद्र रेन्यु पावर कंपनीने बांधण्यात आले आहे.प्रशासकीय आणि राजकीय हस्तक्षेपामुळे या फसवणूक प्रकरणी कारवाई करण्यास पोलिस प्रशासन टाळाटाळ करत आहे.मात्र याचवेळी दुसरीकडे पाटोदा तालुक्यातील बेनसुर येथील शेतकरी बापु बंकट आर्सुळ आणि मयुर भाऊसाहेब झोडगे यांनी त्यांच्या गट क्रमांक ४५ मधील शेताचा मोबदला न देताच शेतातुन तार ओढण्याचे काम करणाऱ्या कंपनीला काम करू नका अशी विनंती करताच पवनचक्की कंपनीच्या सांगण्यावरून पाटोदा पोलिस प्रशासनाचा ताफा घटनास्थळी दाखल झाला आणि शेतकऱ्यांचे काही प्रश्न आहेत का? संबंधित शेतकऱ्याला कंपनीने मोबदला दिला आहे का याची खातरजमा न करताच दमदाटी करत पोलिस गाडीत घालून पाटोदा पोलिस ठाण्यात दिवसभर डांबुन ठेवले आणि रात्री पोलिस संरक्षणात काम सुरुच होते. यामुळे




एकंदरीतच मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार पवन ऊर्जा प्रकल्पाच्या उभारणी कामांना पोलिस संरक्षण दिले जात असताना संबंधित शेतकऱ्याचे ना हरकत अथवा करार किंवा कायदेशीर दस्तावेज कंपनीकडे आहेत का? शेतक-याला मोबदला मिळाला आहे का? शेतकऱ्यांच्या काही अडचणी आहेत का?? याची शहानिशा न करताच पोलिस बळावर शेतकऱ्यांवर अन्याय होत असुन शेतक-यांना वाली कोण?? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.

पोलिस प्रशासनाने पवनचक्की कंपन्यांना संरक्षण देऊ नये अशी भुमिका कोणीच घेणार नाही.मातृर पोलिस प्रशासनाने पवनचक्की कंपन्यांकडून उचल घेतल्यागत पवनचक्की कंपनीचे हस्तक असल्यासारखे वागु नये.शेतक-यांना मोबादला न देताच काम पूर्ण करण्यासाठी पोलिस प्रशासनाकडुन सहकार्य होत असेल तर शेतकऱ्यांवर होणा-या अन्यायाला कोण संरक्षण देणार? मी स्वतः पत्रकार असुन माझे ओळखपत्र दाखवून सुद्धा पोलिसांनी वार्तांकन करण्यास मज्जाव केला. पत्रकारांची मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न असुन संबंधित प्रकरणात पोलिस अधीक्षक बीड नवनित कांवत यांची भेट घेऊन तक्रार करणार असल्याचे पत्रकार तथा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ सक्रिय प्रचारक बीड तालुका मुस्तफा पठाण यांनी सांगितले.

पवन ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी पवनचक्की कंपन्यांच्या आधिका-यांकडून पोलिस प्रशासनाला हाताशी धरुन मोगलाई सुरू असुन दडपशाहीचा अवलंब करत असुन अशिक्षित अडाणी शेतकऱ्यांची दिशाभूल करत कायद्याची भिती दाखवून शेतकऱ्यांवर अन्याय सुरू आहे.पाटोदा पोलिस स्टेशनच्या आधिका-यांनी शेतकऱ्यांना मोबदला दिला नसताना कोणतीही शहानिशा न करता विचारलेल्या प्रश्नांना उडवाउडवीची उत्तरे देत आहेत. पवनचक्की कंपन्यांच्या दडपशाही आणि पोलिस प्रशासनाच्या मनमानी कारभार विरोधात जन आंदोलन उभारण्यात येणार असल्याचे बाळासाहेब मोरे पाटील प्रदेशाध्यक्ष शिवशक्ती भिमशक्ती विचारमंच यांनी सांगितले.

# वंचित संघटित कामगारांच्या प्रश्नावर शेख अमर यांचे कार्य कौतुकास्पद-राजेंद्र मस्के

## बांधकाम कामगारांना गृह उपयोगी वस्तू व सुरक्षा संच वाटप



बीड । प्रतिनिधी

शनिवार दिनांक ८ मार्च रोजी व्हीआयपी हॉल तेलगाव नाका बीड येथे महिला दिनाच्या औचित्य साधून महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनेच्या वतीने व महाराष्ट्र इमारत बांधकाम व इतर कामगार कल्याण मंडळ मुंबई यांच्या संयुक्त विद्यमानाने नोंदणीकृत कामगारांना गृह उपयोगी साहित्य व सुरक्षांच्या साहित्याचे वाटप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, बीड शहर प्रमुख शेख निजाम भाई यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी राजेंद्र मस्के असे म्हणाले की गेल्या अनेक वर्षांपासून बीड शहरांमध्ये बांधकाम मुजरांना संघटित करण्याचे काम माजी नगरसेवक शेख अमर यांनी केले आहे, त्यांचे काम गरजू व वंचित कामगारांसाठी उल्लेखनीय आहे ते सातत्याने कामगाराच्या प्रश्नावर आवाज उठवण्याचे काम करत असतात मजूर कामगारांसाठी शासनाने विविध योजना पुरवल्या पाहिजेत यासाठी त्यांचा लढा सुरू असतो, त्यांच्या संघटनेच्या माध्यमातून हजारो कामगारांना एकजूट करण्याचे काम केले आहे, त्यांना देखील कामगारांनी साथ देण्याचे काम करावे असे मत राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केले आहे, यावेळी हजारो कामगारांना सुरक्षा संच व बृहपयोगी साहित्य वाटप करण्यात आले, यावेळी रतन गुजर,शफिक काजी, शेख आजामभाई, बद्रीनाथ जटाळ, जयवंत वाघ, महेश सावंत,सह कामगारांची उपस्थिती उल्लेखनीय होती.

# पुरुषांची नकारात्मक मानसिकता बदलणे गरजेचे - वसिमा शेख



पाटोदा। प्रतिनिधी

आज प्रत्येक क्षेत्र महिलांनी पादाक्रांत करून आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. अधिकाधिक महिला आर्थिकदृष्टया सक्षम होत आहेत तरीही एक गृहिणी असो किंवा उच्चपदस्थ अधिकारी असो, महिलेच्या मनाचा अनादर केला जातो. घरात व घराबाहेरही महिलेच्या इच्छा आकांक्षांना डावलले जाते. तिच्या निर्णयांना पारिवारिक निर्णय प्रक्रियेत महत्व दिले जात नाही. स्त्रिला भावनिक आधार देऊन तिच्या प्रगतीसाठी आवश्यक सहकार्य केल्यास तिचा आत्मविश्वास वाढतो. पुरुषप्रधान संस्कृतीत जोवर पुरुषाची साथ महिलेला मिळत नाही तोपर्यंत ती खऱ्या अर्थाने यशस्वी होणार नाही, म्हणून स्त्री पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी पुरुषांची महिलांबद्दल असलेली पराकोटीची नकारात्मक मानसिकता आधी बदलणे गरजेचे आहे असे प्रतिपादन पाटोद्याच्या उपविभागीय दंडाधिकारी वसिमा शेख मॅडम यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या.

महाविद्यालयाच्या महिला सक्षमीकरण समिती व अंतर्गत तक्रार निवारण कक्षाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. व्यासपीठावर दुसऱ्या प्रमुख अतिथी म्हणून शहरातील प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. कोमल राख, महिला सक्षमीकरण समिती अध्यक्ष प्रा. मनिषा गाढवे, प्रोफेसर अनिता धारासूरकर उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या प्रारंभी सौ. केशरबाई क्षीरसागर व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाल्यार्पण मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी सर्व प्राध्यापिका व उपस्थित विद्यार्थिनीचा अतिथींच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात डॉ. कोमल राख यांनी सर्व कर्तृत्ववान महिलांना वंदन करून महिलेचा जीवनपट स्पष्ट करणारी व तिचे योगदान सिद्ध करणारी 'ती मला म्हणते मी होऊन बघ' ही प्रेरणादायी कविता सादर केली. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे म्हणाले की, समाजव्यवस्था परिवर्तनशील असते. सर्वांनी प्रथम आपल्या परिवारात स्त्रीला सन्मान देऊन प्रोत्साहन दिले तरच समाजव्यवस्था बदलेल. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. मनिषा गाढवे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सोमनाथ लांडगे यांनी केले. आभारप्रदर्शन प्रो. अनिता धारासूरकर यांनी केले.

# श्रीमद् भागवत कथा सोहळ्यास प्रारंभ

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नांदूर फाटा जवळील खर्डेवाडी ता. जि.बीड येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी पाचवा वेद निर्माते जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांचा बीजसोहळा मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे या बीज उत्सवानिमित्तआज दि.९/३/२०२५ रोजी सकाळी ९ वाजता शिवप्रतिष्ठान वारकरी शिक्षण संस्था दहिफळ वड माऊली येथील बाळू महाराज बसवर आणि त्यांचे शिष्यगण हे संत तुकाराम महाराज व राधा कृष्ण यांच्या वेशभूषेत दिंडीत सहभागी होणार आहेत तसेच भजनी मंडळ देखील दिंडीत सामील होणार आहे. साक्षी कराडकर तसेच सर्व गायनाचार्य वादनाचार्य यांचे स्वागत मोठ्या उत्साहात होणार आहे त्यांनतर दुपारी १ वाजता संगीतमय श्रीमद संगीत भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा प्रारंभ होणार आहे

या संगीतमय भागवत कथेसाठी तबलासाथ राम महाराज गायकवाड, शिंथवादन व गायनाचार्य तुकाराम महाराज कराडकर, गायन साथ शालिनी जाधव बीड, ऑक्टोपॅड वादक रवी महाराज हिंगोली हे आहेत कथा वेळ दुपारी १ते ५अशी आहे. या सात दिवस होणाऱ्या श्रीमद् भागवत कथा अमृत श्रवणाचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक समस्त कळेकर परिवार व महादेव नाना साळुंके यांनी केले आहे.

# महिलांचा सन्मान करणे हीच खरी महिला दिनाची जाणीव-ॲड.मनोज संकाये

## महिला दिनानिमित्त परळी नगरपालिका स्वच्छता कर्मचारी महिलांचा सन्मान

परळी। प्रतिनिधी

''समाजातील कष्टकरी महिलांचा सन्मान करणे हीच खरी महिला दिनाची खरी जाणीव आहे,'' असे प्रतिपादन विधीज्ञ ॲड. मनोज संकाये यांनी केले. आज शनिवार दिनांक ८ मार्च रोजी महिला दिनाचे औचित्य साधून ॲड. मनोज संकाये मित्र मंडळाच्या वतीने परळी नगरपालिकेतील स्वच्छता कर्मचारी महिलांचा सन्मान करण्यात आला. वल्लभ नगर येथील ॲड. संकाये यांच्या संपर्क कार्यालयात आयोजित या कार्यक्रमात कष्टकरी महिलांना साडी, पुष्पगुच्छ व अल्पोपहार देऊन गौरविण्यात आले यावेळी उपस्थित महिला कांताबाई जगतकर, लक्ष्मी डोंगरे, लक्ष्मी हजारे ,आशाबाई कांबळे ,आशा आदोडे, छाया



पैठणी ,संगीता पाढमूखे, यावेळी महिलांनी आनंद व्यक्त केला.

या वेळी नगरपरिषद स्वच्छता सुपरवायझर दगडू मस्के, प्रकाश सीताप, हनुमान झोडगे, जगन्नाथ सरवदे आदी मान्यवरांनी उपस्थित राहून स्वच्छता कर्मचारी महिलांच्या अथक परिश्रमांचे कौतुक केले. तसेच मित्र मंडळाचे पदाधिकारी अनिल चौधरी, प्रवीण रोडे, संदीप चौधरी, संतोष कांबळे, देविदास मुंडे यांनीही आपल्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढवली. या उपक्रमाच्या माध्यमातून महिला सन्मान आणि त्यांचे योगदान अधोरेखित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. महिला सक्षमीकरणाच्या दिशेने उचललेले हे पाऊल समाजाला प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# माजलगाव विकास प्रतिष्ठानतर्फे महिला सशक्तीकरणाचा अभिनव उत्सव

माजलगाव (प्रतिनिधी)

येथील माजलगाव विकास प्रतिष्ठान व लोकनेते सुंदरराव सोळंके नागरी सहकारी पतसंस्था मर्या. यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या आज दि ९ मार्च रविवार रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दिवसभराची कार्यक्रम मालिका आयोजित करण्यात आली आहे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत विविध उपक्रमांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचा संदेश देण्यात येणार आहे.

सकाळच्या सत्रात 'महिला मेळावा २०२५' चे आयोजन सकाळी १०.३० वाजता सुंदरराव सोळंके महाविद्यालयात होणार आहे. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी श्रीमती मंगला सोळंके,अध्यक्ष माजलगाव विकास प्रतिष्ठान व लो. सुंदरराव सोळंके नागरी सहकारी पतसंस्था यांची निवड करण्यात आली आहे. कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बाल विवाह प्रतिबंधाच्या क्षेत्रात कार्यरत श्रीमती सोनिया हंगे (वरिष्ठ प्रकल्प व्यवस्थापक, महिला व विकास विभाग) या विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या सचिव नीला देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला असून,माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या उपाध्यक्ष तथा विधीज्ञ.पल्लवी सोळंके विशेष उपस्थितीमध्ये मंचावर उपस्थित राहणार आहेत . मेळाव्यात बालविवाह प्रथा निर्मूलन तसेच महिलांच्या आरोग्य, शिक्षण,आर्थिक स्वावलंबन, कायदेशीर अधिकार आणि सामाजिक स्थान या विषयांवर सखोल चर्चा होणार असून,उपस्थित महिलांना त्यांच्या प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे जिजामाता नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थिनी लढा बालविवाह प्रथा निर्मूलनाचा ही नाटिका सादर करणार आहेत.

महिला दिनाच्या कार्यक्रमाची सांगता संध्याकाळी 'लोकशास्त्र सावित्री ' या विचारप्रवर्तक मराठी नाटकाच्या प्रयोगाने होणार आहे. या नाटकाची निर्मिती थिएटर ऑफ रेलेव्हन्स शुभचिंतक आणि प्रयोग प्रयोगकर्ता मुंबई यांची असून लेखन व दिग्दर्शन रंगचिंतक मंजुळ भारद्वाज यांनी केले आहे.समाजातील महिलांच्या प्रश्नांवर संवेदनशीलपणे भाष्य करणारे हे नाटक प्रेक्षकांना विचार करायला लावणारे आहे. या नाटकात अश्विनी नांदेडकर,सायली पावस्कर, कोमल खामकर,तुषार म्हस्के, संध्या, नृपाली, प्रियंका, तनिष्का,अरोही, प्रांजल आणि अन्य कलाकार भूमिका साकारणार आहेत. या नाटकाचं प्रकाश योजना अशोक घोलप यांनी केलेला आहे .या चिंतनशील नाटकाद्वारे महिलांचे सामाजिक स्थान, त्यांच्या समस्या आणि स्वातंत्र्य यावर प्रकाश टाकण्यात येणार आहे. नाटकाचे प्रवेश शुल्क प्रत्येकी १०० रुपये असून, शालेय व कॉलेज विद्यार्थ्यांसाठी विशेष सवलत दर ५० रुपये प्रत्येकी ठेवण्यात आला आहे. याच दिवशी लोकनेते सुंदरराव सोळंके नागरी सहकारी पतसंस्थेच्या वर्धापन दिनाचे ही हे औचित्य असल्याने, या कार्यक्रमांना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. या कार्यक्रमांद्वारे माजलगाव येथे महिला सशक्तीकरणाचे वातावरण निर्माण होणार असून, यामुळे स्थानिक व ग्रामीण महिलांमध्ये नवचैतन्य निर्माण होईल अशी आशा आयोजकांनी व्यक्त केली आहे. या कार्यक्रमाला सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकाच्या वतीने करण्यात आलेले आहे.

# राहुल दुबाले यांना विधान परीषदेवर संधी द्यावी - कृष्णा कदम





बीड । प्रतिनिधी

पोलीस कुटुंबियांच्या,अधिकाऱ्यांच्या तसेच सामान्य नागरिकांच्या न्याय हक्कासाठी लढण्यासाठी कायम कठीबद्ध असणारे लढावू नेतृत्व राहुल दुबाले यांना विधान परिषदेच्या रिक्त जागेवर काम करण्याची संधी महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री मा.देवेंद्र फडणवीस साहेबांनी संधी द्यावी.

राहुल दुबाले यांनी आपल्या कार्याच्या जोरावर महाराष्ट्र पोलीस बॉइज संघटनेच्या माध्यमातून महाराष्ट्र भर संघटनेचे जाळे निर्माण केले आहे. कामाचा तगडा अनुभव असणाऱ्या राहुल दुबाले यांना विधान परिषदेवर आमदार म्हणून काम करण्याची संधी द्यावी..

# शिवसंग्रामच्या वतीने पोस्टमन कॉलनी येथे महिला आरोग्य शिबिर

बीड । प्रतिनिधी

संसार सांभाळत महिलांनी स्वतःच्या आरोग्याचीही काळजी घेतली पाहिजे,असे आवाहन शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष प्रा.सुभाष जाधव यांनी केले. पोस्टमन कॉलनी, बीड येथे शिवसंग्रामच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित आयोजित महिला आरोग्य तपासणी शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी शिवसंग्रामचे बीड तालुकाध्यक्ष पंडीत माने, युवक जिल्हाध्यक्ष सुनील कुटे,महिला युवती जिल्हाध्यक्ष गीतांजली डोरले, शहराध्यक्ष सुहास पाटील,शहर उपाध्यक्ष शेषेराव तांबे,युवक नेते प्रशांत डोरले, विभाग प्रमुख हरिश्चंद्र ठोसर,शैलेश सुरवसे यांच्यासह वैद्यकीय अधिकारी डॉ. स्नेहल गोसावी,डॉ.रूपाली सुलाखे,डॉ.शीतल सोनवणे व परिसरातील महिला व युवती मोठया संख्येने उपस्थित होत्या.

लोकनेते स्व. विनायकरावजी मेटे साहेब यांच्या संकल्पनेतून व शिवसंग्रामच्या अध्यक्ष



डॉ. ज्योतीताई मेटे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसंग्रामच्या माध्यमातून विविध समाजपयोगी उपक्रम राबवणारे ठोसर दांम्पत्यांनी प्रतिवार्षाप्रमाणे याही वर्षी प्रभाग एक मधील महिला व युवतीसाठी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिला आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरास परिसरातील महिलांनी उदंड प्रतिसाद देऊन आरोग्य तपासणी करून घेतली.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक करताना सौ.संगीता ठोसर म्हणाल्या की, आज महिला व मुली ह्या स्वतःच्या आरोग्याची काळजी घेत नसल्याचे प्रकर्षाने जाणवते. महिला व मुलींनी आरोग्याकडे लक्ष द्यावे.

एखादा आजार अंगावर न काढता वेळीच औषधोपचार घेतला तर पुढील गंभीर आजारापासून सुटका होते.अनेक घरगुती व्यापमुळे ज्या महिलांना घराबाहेर पडता येत नाही अश्या महिलासाठी महिलाआरोग्य शिबिराचे आयोजन केल्याचे त्यांनी नमूद केले. जिल्हा रुग्णालय बीडच्या वतीने उपस्थित असलेल्या वैद्यकीय अधिकारी व त्यांच्या टीमचे शिवसंग्रामचे विभाग प्रमुख हरिश्चंद्र ठोसर यांनी आभार मानले.

याप्रसंगी शिवसंग्रामचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच प्रभाग एक मधील दै.रिपोर्टरचे श्री.अनंत घिगे, प्रतिष्ठित नागरिक श्री. हनुमंत सपकाळ व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रशासकीय यंत्रणा अवैध धंद्यावर कारवाई का करत नाही?-वसंत मुंडे

परळी। प्रतिनिधी


बीड जिल्ह्यात प्रशासकीय यंत्रणा लोकप्रतिनिधी राजकीय नेते सहकार्य असल्यामुळे अवैध धंद्यावर कारवाई केली जात नाही असा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. बीड जिल्हा महाराष्ट्र मध्ये कष्टाळु जिल्हा म्हणून ओळख आहे. त्यात ऊसतोड कामगार, शिक्षण क्षेत्रात,पोलीस यंत्रणा, मिल्ट्री मध्ये , शासकीय सेवेत मोठ्या प्रमाणात जिल्ह्याचा सिंहाचा वाटा आहे. लोकप्रतिनिधी, राजकीय नेते प्रशासकीय यंत्रणा बीड जिल्ह्यामध्ये अवैद्य नियमबाह्य मटका बुक्की आफु चरस गांजा नियम बाह्यय वीट भट्ट्या अवैध वाळू मुरूम माती थर्मल मधील कोळशाची राख, प्राणी व जनावराची मांस पत्त्यांची बुकिंग संदर्भातील अवैध धंदे मुळे खूप मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहाराची संपूर्ण उलाढाल जिल्ह्यात होते. अवैध धंद्यामुळे पूर्ण जिल्ह्यामध्ये खून दरोडे चोऱ्या लुटमार मुली व स्त्रियावर अत्याचार युवा पिढी गांजा अफू चरसच्या आहारी गेल्यामुळे जीवन उध्वस्त झाले. संपूर्ण जिल्ह्यातील बाजारपेठेवर शिक्षण क्षेत्रात घातक परिणाम झालेले असून जिल्ह्याचे संपूर्ण नाव बदनाम झाले आहे.जिल्ह्यामध्ये सहकारी बँक वेगवेगळ्या मल्टी पतसंस्था मध्ये खूप मोठ्या प्रमाणावर गैर व्यवहार राजकीय नेत्याच्या सहकार्याने केला आहे. मटन खानावळी हॉटेल विनापरवाना सर्वच ठिकाणी अवैद्य मध विक्री होत असून राजकीय नेते लोकप्रतिनिधी व प्रशासकीय यंत्रणेचे सहकार्य असल्यामुळे अवैध धंद्यावर कारवाई केली जात नाही. जे कर्मचारी प्रशासकीय अधिकारी अवैद्य धंद्यांना सहकार्य करतात त्यांच्या तात्काळ बदल्या बीड जिल्ह्याबाहेर करण्यात याव्यात अशी मागणी काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी शासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# वातावरणातील बदलामुळे रुग्णालये हाउसफुल्ल

## दिवसा कडक ऊन आणि रात्री थंडीची चाहूल असल्याने रुग्णांची संख्या वाढली

केज । दुर्गादास लांब

वातावरणात बदल झाल्यामुळे दिवसा ऊन जास्त प्रमाणात आणि रात्री थंडी वाढली असल्यामुळे लहान मुले व वयोवृद्ध लोकांचे आजारी पडण्याचे प्रमाण वाढले आहे लोकांना ताप सर्दी खोकला घशामध्ये घरघर किंवा चक्कर येणे अशा आजारामुळे सध्या खाजगी व सरकारी रुग्णालय हाउसफुल झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे त्यामुळे सध्या लहान मुले व वयोवृद्ध माणसांची काळजी घेणे हा महत्त्वाचा विषय ठरला आहे यामध्ये बाजारातून आणलेले फळ स्वच्छ पाण्याने धुतल्या शिवाय कोणीही खाऊ नयेत फ्रिजमधील थंड पाणी, कोल्ड्रिंक्स अशा गोष्टी सेवन करण्याचं शक्यतो टाळाव्यात ज्यामुळे लहान मुले किंवा वयोवृद्ध माणसं आजारी पडणार नाहीत अशाप्रकारे सर्वांची काळजी घेता येईल सध्या तरी लहान मुले व वयोवृद्धांची आजारी असल्याची संख्या जास्त असल्यामुळे रुग्णालय हाउसफुल झाल्याचे पहावयास मिळत आहे.



वातावरणातील झालेले बदल तसेच सध्या लहान मुलांमध्ये आईस्क्रीम, गारीगार, पेप्सी, कोल्ड्रिंक्स, थंड पेय असे सेवन करण्याचे प्रमाण वाढल्याने हे आजार होत असल्याचे समोर येत आहे यामुळे लहान मुलांना सर्दी, ताप, खोकला, घशामध्ये घरघर, करणे किंवा चक्कर येणे तसेच वयोवृद्ध माणसांना देखील अशाच प्रकारे आजार होत असल्याने सर्वांनी आजार होऊ नये यासाठी काळजी घेणे गरजेचे आहे. दिवसा जास्त प्रमाणात ऊन व रात्री थंडी वाढल्याचे मागच्या तीन चार दिवसापासून आपल्याला जाणवत आहे त्यामुळे खास करून ग्रामीण भागातील जनतेने आपल्या मुलाबाळांची व वयोवृद्ध माणसांची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे ज्यामुळे आपल्या घरातील कोणी आजारी पडू नये सध्या या बदललेल्या वातावरणामुळे शहरातील व ग्रामीण भागातील शासकीय व खाजगी रुग्णालय हाउसफुल झाल्याचे दिसत आहे.

**रात्रीच्या वेळी थंडी व दिवसा ऊन हे सध्या वातावरणातील बदल झाल्यामुळे नागरिकांनी थंड कोल्ड्रिंक्स फ्रिजमध्ये ठेवलेले फळे, धुतल्या शिवाय खाऊ नयेत तसेच थंड पाणी उन्हातून आल्यानंतर पिऊ नये यामुळे सर्दी ताप खोकला जुलाब चक्कर येणे अशक्तपणा वाटणे असे आजार होऊ शकतात त्यामुळे या सर्व गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे जेणेकरून कोणीही आजारी पडणार नाही**

**डॉ.दिलीप डोईफोडे, बी. ए. एम. एस**



बीड : जागतिक महिला दिनानिमित्त बीड येथे जिल्हा माहिती कार्यालयातील आंबीलवादे मॅडम यांचा सत्कार करताना प्राजक्ताताई धस

## दोन लाखाची लाच मागितल्या प्रकरणी महावितरणच्या दोन अभियंत्यासह कंत्राटदारावर गुन्हा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील पुस येथील शेतातील ३३ के.व्ही.ची लाईन स्थलांतरीत करण्यासाठी महाविरणचे उपअभियंता व कनिष्ठ अभियंता व कंत्राटदार यांनी दोन लाख रूपयांची लाच मागितल्या प्रकरणी या तिघा जणांविरूद्ध बर्दापुर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे.

पुसे येथील शेतकरी श्रीकर त्रिंबकराव फड यांच्या पुस येथील शेतात पेट्रोल पंप मंजूर झाला आहे. या ठिकाणी असणारी ३३ के.व्ही.ची लाईन स्थलांतरीत करण्यात यावी. यासाठी फड यांनी महाविरणचे उपअभियंता सतिष नामदेवराव कानडे, कनिष्ठ अभियंता सतिष अप्पाराव गुडे व महाविरणचे कंत्राटदार बळवंत आण्णासाहेब गंगणे रा. अंबाजोगाई या तिघांनी संगणमत करून ३३ के.व्ही.ची लाईन स्थलांतरीत करण्यासाठी दोन लाख रूपयांची लाच मागितली. तसेच ही लाईन हाटवण्यासाठी प्रशासकीय कामाच्या माध्यमातून विविध आडथळे आणले. व काम करण्यासाठी दिरंगाई लावली. अशी तक्रार फिर्यादी फड यांनी केली आहे. या प्रकरणी बर्दापुर पोलिस ठाण्यात दोन अभियंते व कंत्राटदार यांच्या विरूद्ध कलम ४०९, ४२०, ३४ भादवि अन्वये बर्दापुर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे.

## अंबा साखर कारखान्याचे माजी संचालक वसंत शिंदे यांचे निधन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे संचालक वसंत शिंदे( वय – ६५ )यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले.




वसंतराव शिंदे गेल्या अनेक वर्षांपासून मधुमेह व हृदयविकाराच्या आजाराने ग्रस्त होते, वसंतराव यांना औरंगाबाद, अंबाजोगाई येथील विविध दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते.मात्र दिनांक ७/३/२०२५ शुक्रवारी रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास अचानक हृदयविकाराचा तिव्र झटका आल्याने निधन झाले , वसंतराव शिंदे यांच्या पार्थिवावर आपेगाव येथे दिनांक ८/३/२०२५ रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले त्यावेळी आपेगाव पंचक्रोशीतील बहुसंख्येने नागरिक उपस्थित होते. स्व वसंतराव शिंदे यांच्या पश्चात पत्नी सुरेखा , एक मुलगी ज्योती, दोन मुले रमाकांत व सूर्यकांत शिंदे, ,सूना, नातवंडे असा भरगच्च परिवार आहे.

# कत्तलीसाठी आणलेल्या १४ गोवंशीय जनावरांची सुटका

## अंबाजोगाई पोलिसांची कारवाई

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील बाराबाई गल्ली परिसरात गोवंश जनावरे निर्दयपणे बांधून ठेवण्यात आल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे बीड पोलिस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली अंबाजोगाई पोलिसांनी शुक्रवारी रात्री उशिरा छापा टाकत १४ गोवंश जनावरांची सुटका केली.



अंबाजोगाई शहरातील बाराभाई गल्लीत काही गोवंशीय जनावरे कत्तलीसाठी बांधून ठेवण्यात आल्याची माहिती पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांना मिळाली होती. त्या आधारे पोलीस निरीक्षक विनोद घोळवे, सपोनि कांबळे, पोउपनि पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ०७ मार्च २०२५ रोजी रात्री ११:४३ वाजता बाराबाई गल्लीत रवाना होत छापा मारला. यावेळी १४ गोवंशीय जनावरे, ज्यांची एकूण किंमत सुमारे ₹२,३९,०००/– इतकी आहे, ती निर्दयपणे बांधलेली आढळली. पोलिसांनी पंचनामा करून जनावरांना ताब्यात घेतले आणि पुढील सुरक्षेसाठी वरवटी येथील लोकनेते गोपीनाथ मुंडे गोरक्षण शाळेत हलवले. या प्रकरणी अज्ञात व्यक्तींविरोधात प्राण्यांच्या छळ प्रतिबंधक कायदा १९६० (कलम ११(१)(), ११(१)()), महाराष्ट्र पशू संरक्षण अधिनियम १९७६ (कलम ५ आणि ९), तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम (कलम ११९) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास अंबाजोगाई पोलिस करत आहेत.

## सुंदरराव सोळंके महाविद्यालयात महिला दिन उत्साहात साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

सुंदराराव सोळंके महाविद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त ऑनलाईन व्याख्यान घेण्यात आले तसेच महिला प्राध्यापिकांचा व महिला कर्मचाऱ्यांना सत्कार करून महिला दिन साजरा करण्यात आला.

सुंदराराव सोळंके महाविद्यालयात महिला दिनानिमित्त महिला कक्षाच्या वतीने ऑनलाईन वेबिनार घेण्यात आला.यावेळी कोल्हापूर येथील राजश्री साकळे यांनी ''स्त्री पुरुष समानतेच्या कार्यपद्धतीला गती देणे '' या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अर्चना कचरे होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ.जी.के.सानप यांची प्रमुख उपस्थिती होती.वेबिनारचे सूत्रसंचालन प्रा.वैशाली शहाणे यांनी केले तर आभार प्रा.नमिता वडमारे यांनी केले.प्रारंभी महिला दिनानिमित्त क्रांतीज्योती ◀◀ पान २ वर





माजलगाव:– येथील प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉक्टर मुजीब सौदागर हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे जिल्हा सरचिटणीस कचरू तात्या खळगे, बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी मोरे,राजेंद्र होके, प्रदीप पटेकर, पत्रकार महेंद्र मस्के, सचिन डोंगरे,प्रदीप कर्डिले आदी.

# प्रमोद महाजन इंग्लिश स्कूलमध्ये बाल आनंद मेळावा उत्साहात

## मा.आमदार केशवराव आंधळे यांच्या हस्ते बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन

वडवणी । प्रतिनिधी

आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून वडवणी येथील,प्रमोद महाजन इंग्लिश स्कूलमधील विद्यार्थ्यांमध्ये व्यावहारिक ज्ञान व व्यावसायिक दृष्टिकोन विकसित व्हावा या उद्देशाने बाल आनंद मेळाव्याचे आयोजन शनिवार दि. ८ मार्च २०२५ रोजी करण्यात आले होते.

माजी आमदार केशवराव आंधळे यांच्या शुभहस्ते फीत कट करून बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून वडवणी नगरपंचायतचे उपनगराध्यक्ष बन्सीधरराव मुंडे तसेच कृ.उ.बा.स.उपसभापती अनिलदादा चोले,मा.नगरसेवक सतीश बप्पा बडे,सेवानिवृत्त मुख्याध्यापक मधुकरराव धस,कृ.उ.बा.संचालक पांडुरंगबापू अंडील,संस्थेच्या संचालिका सौ.जिजाबाई धस,संस्थेचे संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे,इंग्लिश स्कूलच्या कार्यालयीन प्रभारी तथा मार्गदर्शिका श्रीमती शोभा आंधळे,प्राचार्य राऊत डी.डी.,पत्रकार गितांजली लव्हाळे,पत्रकार संघाचे डिजिटल मीडिया तालुकाध्यक्ष सतीश मुजमुले,पत्रकार अर्जुन मुंडे,पत्रकार शंकरजी झाडे,पत्रकार व्ही.एस.डोईफोडे आदिजन मान्यवर म्हणून उपस्थित होते.



मा.नगरसेवक सतीश बप्पा बडे व उपनगराध्यक्ष बन्सीधरराव मुंडे यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाले की,माजी आमदार केशवराव आंधळे साहेब यांनी पहिली मुलींची शाळा वडवणी तालुक्यात सुरू केली तसेच प्रमोद महाजन इंग्लिश स्कूल मध्ये सर्व टीचिंग स्टाफ हा महिला आहे सर्वप्रथम आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या माता–भगिनीना शुभेच्छा दिल्या तसेच इंग्लिश स्कूल मधील बाल आनंद मेळाव्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षिकांचे अभिनंदन करून स्टॉल धारक विद्यार्थ्यांना बाल आनंद ◀◀ पान २ वर

# देवळा गावच्या महिलांची गट शेतीतून क्रांती!

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यातील देवळा गावच्या महिलांनी शेती क्षेत्रात एक अनोखी क्रांती घडवून आणली आहे. या गावातील ११ कुटुंबातील महिलांनी एकत्र येत गटाची स्थापना केली आणि त्या शेतीतील सर्व कामे स्वत: करू लागल्या. बीज प्रक्रिया ते काढणीपर्यंतच्या सर्व कामांमध्ये त्या प्राविण्य मिळवलेल्या आहेत. ट्रॅक्टर फवारणी यासारख्या विविध कामांमध्ये त्या एकमेकाला मदत करतात.**







## ट्रॅक्टरने सगळी कामे करतात महिला!

बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यातील देवळा गावच्या महिला... ११ महिलांनी एकत्र येत ऑरगॅनिक ग्रामीण किसान शेतकरी गटाची स्थापना केली आणि या गटाच्या माध्यमातून त्या एकमेकींच्या शेतीत सांगड पद्धतीने काम करत आहेत. नांगरणी, पेरणी, खुरपणीसह आदी कामे सांगड पध्दतीने करत असल्याने त्यांच्या पैश्याची देखील बचत होत आहे.. विशेष म्हणजे ट्रॅक्टर चालवण्यापासून सर्व कामे या महिला करतात...कृषी विज्ञान केंद्र, पाणी फाउंडेशन आणि कृषी विभागाकडून या महिलांना वेळोवेळी मार्गदर्शन केले जाते. गटाच्या महिला बैठकीच्या माध्यमातून एकत्र येऊन सर्वांच्या सुख दुःखात सामील होतात....योगिता खामकर सांगतात की मी शेतात मध्ये खूप काम करायचे मात्र माझे पती त्या कामाबद्दल अभिमान बाळगत नसत मात्र मी गट शेतीच्या महिलांसोबत आल्यास माझं मन मोकळं झालं आणि मला सन्मान मिळू लागला.या महिलांचे एकीकरण समाजातील इतर महिलांना निश्चित प्रेरणादायी ठरत आहे. त्यांच्या या यशाने इतर गावातील महिलांनाही अशा प्रकारचे गट तयार करण्यासाठी प्रोत्साहन मिळत असून. यामुळे गावातील महिला सशक्तीकरणाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल पडले आहे. त्यामुळे अशा महिला गावोगाव निर्माण व्हाव्यात अशीची मागणी होऊ लागली आहे. जागतिक महिला दिनानिमित्त या महिलांच्या कतृत्वावर कष्टाला परीसिमा नसते हेच यावरुण दिसुन येते.

जागतिक
महिला दिन विशेष

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk



# स्त्रीशक्ती हीच समाजाची खरी ताकद - प्रा. राजश्री भोसले

**पुणे । प्रतिनिधी**

**नाना पेठ येथील डीसीएम सोसायटी ऑफ इंडियाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाणिज्य आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे कला महाविद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने करण्यात आले होते.**



कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सामाजिक कार्यकर्त्या प्रा. राजश्री भोसले, प्राचार्य डॉ. प्रवीण कांबळे, उपप्राचार्य डॉ. नरेश पोटे, माजी प्राचार्य डॉ. भारती सहस्रबुद्धे, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. जयश्री कांबळे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रूपाली भागवत, निर्भय कन्या विभाग प्रमुख डॉ. अरुणा मुडावत, विद्यार्थिनी मंच विभाग प्रमुख डॉ. कोमल भोसले, प्रसिद्धी प्रमुख प्रा. रेखा मोरे, सहाय्यक परीक्षा विभाग व व्यक्तिमत्व विकास विभाग प्रमुख स्नेहा भोसले, यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष डी. टी. रजपूत, जनरल सेक्रेटरी विशाल शेवाळे आणि खजिनदार सिद्धार्थ शेवाळे यांनी सहकार्य केले आणि महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. प्रमुख अतिथी प्रा.राजश्री भोसले यांनी आपल्या भाषणात स्त्रीशक्तीच्या महत्त्वावर भर दिला. त्या म्हणाल्या, महिला दिन हा केवळ उत्सव नसून, महिलांच्या संघर्षाचा, यशाचा, हक्कांचा आणि सन्मानाचा दिवस आहे. समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात महिलांनी आपली जिद्द आणि कर्तृत्व सिद्ध करून दाखवले आहे. शिक्षण, विज्ञान, व्यवसाय, कला किंवा सामाजिक कार्य – सर्वच क्षेत्रांत महिला अग्रेसर आहेत.

त्यांनी महिलादिनाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर प्रकाश टाकत १८५७ साली न्यूयॉर्क येथे महिलांनी समान हक्क आणि वेतनासाठी केलेल्या आंदोलनापासून १९७५ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने अधिकृत मान्यता दिलेल्या आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या प्रवासाचे विवेचन केले. त्या पुढे म्हणाल्या, महिला सशक्तीकरण म्हणजे महिलांना समान संधी, शिक्षण, रोजगार, सुरक्षा आणि निर्णयस्वातंत्र्य मिळणे. मात्र, अजूनही समाजात लिंगभेद आणि अन्याय कायम आहे. म्हणूनच महिला सबलीकरण हा आजच्या काळातील सर्वांत महत्त्वाचा विषय आहे. राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. जयश्री कांबळे यांनी सांगितले की, स्त्री ही केवळ एक नातेसंबंधांपुरती मर्यादित नाही, तर ती एक सक्षम व्यक्ती आहे. समाजातील प्रत्येकाने महिलांचा सन्मान केला पाहिजे आणि त्यांच्या प्रगतीसाठी हातभार लावला पाहिजे. माजी प्राचार्य डॉ. भारती सहस्रबुद्धे यांनी विद्यार्थिनींना संदेश दिला की, शिक्षण आणि कौशल्य आत्मसात करा, स्वतःच्या हक्कांसाठी आवाज उठवा, स्वावलंबी बना आणि कोणत्याही परिस्थितीत हार मानू नका. 'बेटी बचाव, बेटी पढाव' ही योजना केवळ घोषणा नसून समाजाची खरी गरज आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा स्नेहा भोसले म्हणाल्या, जागतिक महिला दिन केवळ एक दिवस साजरा करण्यासाठी नसून, महिलांच्या हक्कांसाठी, समानतेसाठी आणि सशक्तीकरणासाठी नवा संकल्प करण्याचा दिवस आहे. प्रत्येकाने स्त्रियांचा आदर केला पाहिजे आणि त्यांच्या प्रगतीसाठी सहकार्य केले पाहिजे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. कोमल भोसले यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.रूपाली भागवत यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा.अरुणा मुडावत यांनी मानले.

# शहरात होतेय भेसळयुक्त पनीरची विक्री; १४०० किलो पनीर जप्त

**पुणे । प्रतिनिधी**




शहरात भेसळयुक्त पनीरची विक्री होत असल्याचा प्रकार अन्न आणि औषध प्रशासन विभागाने (एफडीए) आणि पोलिसांनी उघडकीस आणला. पोलिसांच्या पथकाने मांजरीतील एका भेसळयुक्त पनीर तयार करणाऱ्या उत्पादकाच्या कारखान्यात कारवाई केली. या कारवाईत १४०० किलो पनीर, भेसळ करण्यासाठी वापरली जाणारी १८०० किलो एसएमपी पावडर, ७१८ लिटर पामतेल असा ११ लाख ५६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

मांजरी भागातील एका शेतातील गोदामात मोठ्या प्रमाणावर भेसळयुक्त पनीरचा साठा करण्यात येत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या युनिट सहाचे प्रभारी पोलीस निरीक्षक वाहिद पठाण, पोलीस कर्मचारी सचिन पवार, रमेश मेमाणे यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी एफडीएच्या पथकाला या घटनेची माहिती दिली.

त्यानंतर एफडीए आणि पोलिसांच्या पथकाने मांजरीतील माणिकनगर परिसरात असलेल्या गोदामावर छापा टाकला. गोदामातून १४०० किलो पनीर, १८८० किलो एसएमपी पावडर, ७१८ लिटर पामतेल जप्त केले. पंचासमक्ष भेसळयुक्त पनीरचे नमुने तपासणीसाठी प्रयोगाळेत पाठविण्यात आले. भेसळयुक्त पनीरचा साठा पंचासमक्ष नष्ट करण्यात आला.

एफडीएचे सहआयुक्त डॉ. राहुल खाडे, अतिरिक्त पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे, उपायुक्त निखील पिंगळे, सहायक आयुक्त राजेंद्र मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक वाहिद पठाण, एफडीएतील अधिकारी नारायण सरकटे, बालाजी शिंदे, अस्मिता गायकवाड, सुप्रिया जगताप, एल. डब्ल्यू. साळवे, तसेच पोलिसांच्या पथकाने ही कारवाई केली.

# खेड एमआयडीसीमध्ये स्थानिक गुंडांचा हैदोस, ह्युंदाई कंपनीचे कंत्राट घेण्यावरून दोन गुंडांचे गट भिडले



पुणे: राज्यात उद्योगांसाठी पोषक वातावरण निर्माण झालंय अन् अनेक उद्योजक महाराष्ट्राला पसंती देत असल्याचा दावा सरकार वेळोवेळी करतंय. पण खरंच असं चित्र आहे का? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असोत की उपमुख्यमंत्री अजित पवार असोत, गुंडांची भाईगिरी खपवून घेऊ नका असे आदेश त्यांनी दिले होते. तरीही औद्योगिक पट्ट्यात गुंडांची दहशत कायम आहे. पुण्याच्या खेडमध्ये ह्युंदाई कंपनीत दोन गटांमध्ये झालेल्या तुंबळ हाणामारीने यावर शिक्कामोर्तब केलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवारांनी पिंपरी चिंचवड पोलिसांच्या कार्यक्रमात गुंडांचा बंदोबस्त लावण्याचे आदेश कडक शब्दात दिले. गुंडांचे उपद्रव खपवून घेऊ नका, उद्योगांना पोषक वातावरण तयार करा असं दस्तुरखुद्द मुख्यमंत्र्यांनी सूचना दिल्यानंतर उद्योगक्षेत्र भयमुक्त होईल अशी अपेक्षा होती. मात्र महिन्याभराच्या आतच पुण्याच्या खेड तालुक्यात हा राडा झाला. ह्युंदाई कंपनीत कंत्राट मिळवण्यासाठी दोन गटांमध्ये कंपनीच्या गेटवर अशी तुंबळ हाणामारी झाली. लाठ्या-काठ्या, लोखंडी गज, बॉटल अगदी गेटवरील सुरक्षेच्या वस्तूंनी डोकी फोडण्यात आली. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी हेच व्हिडीओ पोस्ट करत अनेक गंभीर प्रश्न उभे केले आहेत. ह्युंदाई कंपनीच्या गेटवर झालेल्या तुंबळ हाणामारी प्रकरणी परस्परविरोधी गुन्हे ही दाखल झाले आहेत. या प्रकरणी चौघांना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. इतरांचा शोध सुरु आहे. यानिमित्ताने कंत्राट पद्धतीसाठी नियमावलीच्या अधीन कामं देण्याच्या सूचना पोलिसांनी कंपन्यांना दिल्या आहेत. परदेशातील अन् परराज्यातील कंपन्या राज्यात आणण्यासाठी सरकार सर्वोतोपरी प्रयत्न करतंय. मात्र स्थानिक गुंडांचा वाढत्या त्रासाने उद्योजकांमध्ये भीतीचं वातावरण कायम आहे. त्यामुळं गुंडांच्या भाईगिरीचा बंदोबस्त लावण्याची मागणी उद्योजक संघटनांकडून केली जात आहे. राज्यात परकीय गुंतवणूक वाढवायची असेल तर औद्योगिक पट्ट्यातील गुंडगिरीला मुळासकट उपटून काढण्याची गरज आहे. मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांनी कडक शब्दात पोलिसांना आदेशही दिलेत. तरी घोडं नेमकं आडतंय कुठं? या आकांपर्यंत पोलिस का पोहचत नाहीत? की त्यांना पोहचू दिलं जात नाही? या प्रश्नांची उत्तरं आता पोलिसांना द्यावी लागणार आहेत.

# रक्तचंदनप्रकरणी आणखी तिघांना अटक

पिंपरी : पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेच्या मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाने २ मार्च रोजी पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर मोठी कारवाई करत रक्तचंदनाची तस्करी करणार्या टोळीचा पर्दाफाश केला. या कारवाईत पोलिसांनी एक कंटेनर जप्त केला असून, त्यामधून तब्बल ११ टन ४९० किलो रक्तचंदन हस्तगत करण्यात आले. या कारवाईदरम्यान सुरुवातीला दोन जणांना अटक करण्यात आली होती. मात्र अधिक तपासाअंती पोलिसांनी या तस्करीत आणखी तिघांचा सहभाग उघडकीस आणत त्यांना अटक केली आहे.



सुरुवातीला राजाराम गंगाराम गायखे (४२, अहिल्यानगर) आणि हरप्रीतसिंग धरमसिंग बदाना (४२, वेस्ट ठाणे) यांना अटक केली होती. त्यांची चौकशी करत असताना आणखी आरोपींची नावे समोर आली. त्यानुसार, गुरुवारी (६ मार्च) पोलिसांनी श्रीकांत शंकर भिलारे (३८, नवी मुंबई), इंद्रावन बाबाजी माने (३४, नवी मुंबई) आणि दीपक पोपट साळवे (४२, अहिल्यानगर) यांना अटक केली.


मालमत्ता गुन्हेविरोधी पथकातील पोलिस कर्मचारी महेश खांडे आणि नितीन लोखंडे यांना मिळालेल्या माहितीनुसार, पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर उर्से टोलनाका येथे मोठी कारवाई करण्यात आली. त्यामध्ये ११ टन ४९० किलो रक्तचंदन आढळले. जप्त केलेल्या रक्तचंदनाची अंदाजे किंमत ८ कोटी ६१ लाख ७५ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

या प्रकरणात ट्रकचालकासह आणखी एका व्यक्तीला सुरुवातीला ताब्यात घेतल्यानंतर चौकशी दरम्यान मोठ्या तस्करी रॅकेटचा छडा लागला. पोलिसांनी त्यांची कसून चौकशी केली असता, या तस्करीमध्ये आणखी तिघांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार, पोलिसांनी नवी मुंबई आणि अहिल्यानगर येथे शोधमोहीम राबवत श्रीकांत भिलारे, इंद्रावन माने आणि दीपक साळवे यांना अटक केली. याप्रकरणी आणखी कोणी या तस्करीमध्ये सहभागी आहे का, हे शोधण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली आहेत. जप्त केलेल्या रक्तचंदनाचा साठा कुठून आणला गेला आणि हा माल कोठे पाठवला जाणार होता, याचा तपास सुरू आहे. पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखा या प्रकरणाचा अधिक तपास करत असून, आणखी काही आरोपींची नावे उघड होण्याची शक्यता आहे.

# अखेर अकरा महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर महापालिकेला मिळाले अतिरिक्त आयुक्त

**पुणे । प्रतिनिधी**

औद्योगिक विकास संचालनालयाचे अतिरिक्त विकास आयुक्त एम. जे. प्रदीपचंद्रन यांची पुणे महापालिका अतिरिक्त आयुक्तपदी नेमणूक करण्यात आली आहे. अखेर अकरा महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर महापालिकेला अतिरिक्त आयुक्त मिळाले आहेत.



पुणे महापालिकेत अतिरिक्त आयुक्त पदाच्या एकूण तीन जागा आहेत. त्यात दोन जागा थेट आयएएस दर्जाच्या अधिकार्यांसाठी असून, त्यांची नियुक्ती थेट राज्य शासनामार्फत होते. तर एका अतिरिक्त आयुक्तपदाची नियुक्ती पालिकेतील सेवाज्येष्ठतेनुसार शासनामार्फतच केली जाते. या तीन अतिरिक्त आयुक्तांमधील राज्य शासनाकडील व महापालिकेतील अशा दोन अतिरिक्त आयुक्तांच्या जागा लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वीपासून रिक्त आहेत. एकच अतिरिक्त आयुक्त असल्याने प्रशासकीय कामकाजावरही परिणाम होत होता. अखेर शासनाने २०१२ च्या बॅचचे आएएस अधिकारी व औद्योगिक विकास संचालनालयाचे अतिरिक्त विकास आयुक्तपदी कार्यरत असलेले एम. जे. प्रदीपचंद्रन यांची अतिरिक्त आयुक्तपदी बदली करण्याचे आदेश गुरुवारी उशीरा काढले. आता दोन अतिरिक्त आयुक्त आणि एक अप्पर आयुक्त पालिकेलकडे आहेत.महापालिका अधिकार्यांमधून पदोन्नतीने अतिरिक्त आयुक्तपदी रिक्त असलेल्या जागेवर निवडीची आता प्रतीक्षा उरली आहे. महापालिकेकडून या पदासाठी मुख्य लेखापाल उल्का कळसकर यांचे नाव राज्य शासनाला पाठविण्यात आले आहे. मात्र, त्यावर निर्णय घेण्यासाठी नगरविकास विभागाने बोलाविलेली डीपीसीची बैठक तीन वेळा तहकूब झाल्याने गेल्या वर्षभरापासून निर्णय झालेला नाही.

# आरोपीला मदत करणे आले अंगलट; पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्याचे निलंबन

**शिरुर । प्रतिनिधी**

करडे येथील माजी सैनिक पत्नी एका कंपनीत भागीदार असताना तिची आर्थिक फसवणूक करत बनावट कागदपत्रे बनवून तिचा राजीनामा घेत तिला कंपनीच्या भागीदारीतून काढून टाकण्यात आले होते. याबाबत शिरुर पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल झाल्यानंतर वारंवार आरोपीच्या संपर्कात राहून त्यांना मदत केल्याप्रकरणी शिरुर पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक हणमंतराव शिवाजी गिरी तसेच पोलिस हवालदार नारायण भिमराव जाधव यांना पुणे ग्रामीणचे पोलिस अधिक्षक पंकज देशमुख यांनी निलंबित केले आहे.

करडे (ता. शिरुर) येथील डब्ल्यू स्केअर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (थीरिंश षशशवी ळपवळर रिीर्शींश श्रळाळींशव) या कंपनीत एका माजी सैनिकाची पत्नी कंपनीत भागीदार असताना बनावट कागदपत्रे बनवून तिचा राजीनामा घेत तिला कंपनीच्या भागीदारीतून काढून टाकण्यात आले होते. याबाबत रेश्मा राहुल वाळके (वय ३७) रा. करडे यांनी शिरुर पोलिस स्टेशन येथे चार जणांविरोधात २७ जानेवारी २०२५ रोजी फिर्याद दाखल केली असून ४० दिवस उलटूनही यातील चारही आरोपी अद्याप फरारच आहे.

सदर गुन्ह्यामध्ये प्रियंका संभाजी वाळके, संभाजी दगडु वाळके आणि सचिन संभाजी वाळके व इतर आरोपी आहेत. शिरुर पोलिस स्टेशनचा एक वरिष्ठ अधिकारी सदर आरोपीच्या संपर्कात राहून त्यांना मदत करत असल्याची लेखी तक्रार माजी सैनिक पत्नीने पुणे ग्रामीणचे पोलिस अधिक्षक पंकज देशमुख यांच्याकडे केली होती. त्याच अनुषंगाने आरोपी सचिन संभाजी वाळके याच्या मोबाईलचे कॉल डिटेल्स काढुन सदर कॉल डिटेल्सचे अवलोकन करण्यात आले. त्यामध्ये दि. ७ नोव्हेंबर २०२४ पासुन ते दि. २९ जानेवारी २०२५ या दरम्यान सहायक पोलिस निरीक्षक हणमंतराव गिरी यांनी आरोपी सचिन वाळके याला एकूण ७९ कॉल्स केलेले आढळून आलेले आहेत. तर दि ३० नोव्हेंबर २०२४ पासुन ते दि. २९ जानेवारी २०२५ या दरम्यान पोलिस हवालदार नारायण जाधव यांनी त्यांच्या फोनवरुन आरोपी सचिन वाळके याला एकुण २५ कॉल्स केल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे हणमंतराव गिरी आणि नारायण जाधव यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय गंभीर गुन्ह्यातील आरोपी यांच्या संपर्कात राहुन अत्यंत बेशिस्त व बेजबाबदार गैरवर्तन केले असल्याचे दिसून आलेले असल्याने सदर प्रकरणात त्यांनी दाखवलेल्या संशयित वर्तनाबद्दल त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करत त्यांचे निलंबन करुन त्यांची मुख्यालयात नेमणुक करण्यात आली आहे.

शिरुर पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक हणमंतराव गिरी आणि पोलिस हवालदार नारायण जाधव यांच्यावर पुणे ग्रामीणचे पोलिस अधिक्षक यांनी केलेल्या निलंबनाच्या कारवाईचे सर्वसामान्य नागरिकांनी स्वागत केले आहे. करडे येथील माजी सैनिक पत्नीची आर्थिक फसवणुक झालेली असताना एकीकडे पोलिस निरीक्षक संदेश केंजळे आणि तपास अधिकारी पोलिस उपनिरीक्षक सागर शेळके हे आरोपीचा शोध घेत असताना त्याच पोलिस स्टेशनमधील अधिकारी आणि कर्मचारी आरोपीच्या संपर्कात राहुन त्यांना मदत करत होते. त्यामुळे 'जर कायद्याचे रक्षकच भक्षक व्हायला लागले.' तर दाद मागायची कोणाकडे असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला होता. परंतु या दोन पोलिस कर्मचाऱ्यांच्या निलंबनामुळे आता इतर पोलिस कर्मचाऱ्यांना वचक बसणार आहे.

# पुण्यात भर रस्त्यावर लघुशंका करणाऱ्या लेकाची आणि बापाची गुन्हेगारी हिस्ट्री समोर

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरात मद्यधुंद अवस्थेमध्ये रस्त्याच्या मधोमध चारचारी इचथ गाडी उभी करून अश्लील चाळे करणाऱ्या तरुणाबाबत एक महत्वपूर्ण माहिती समोर आली आहे. पुण्यातील भर चौकात लघुशंका करणार्या आणि अश्लील चाळे करणार्या गौरव आहुजा आणि त्याचे वडील मनोज आहुजा (चरपेक्ष - हीक्षर) या दोघांची पार्श्वभुमी गुन्हेगारी स्वरुपाची असल्याचे पुढे आले आहे. आहुजा बापलेक हे जुगाराच्या धंद्यात सक्रीय राहीलेले आहे.



शिवाय पोकर गेम, क्रिकेट सामन्यांचे बेटींग घेणे आणि मटक्याचा व्यवसाय चालवणं, अशा वेगवेगळ्या स्वरुपाचे जुगाराशी संबंधित धंदे आहुजा बाप लेक करत आले असल्याची माहिती तपासात पुढे आली आहे. त्यामुळे आहुजा बाप लेकांचे पाय आणखी खोलात असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सध्या या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस (झींपश झेश्रळलश) करत असून या प्रकरणी आता पोलीस नेमकी काय कारवाई करते, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

पुढे आलेल्या माहितीनुसार, या प्रकरणात मनोज आहुजा आणि त्याच्या मित्रावर गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अटकेसाठी पोलीस त्याचा शोध घेत आहेत. दरम्यान, जुगाराच्या पैशातुन आहुजा बाप लेकांनी हॉटले व्यवसायात देखील गुंतवणुक केलीय. पुण्यातील स्वारगेट भागात आहुजा कुटुंबाच क्रीम एंड कीचन या नावाचं हॉटेल देखील आहे. गौरव आहुजाला दारुचे व्यसन तर आहेच, त्याचबरोबर तो आणखी कोणती नशा करतो का? याचाही पोलीस तपास करणार आहेत. येरवडा भागात अश्लील चाळे केल्यानंतर गौरव आहुजा त्याच्या मित्रासह फरार झाला असून पोलीस त्याचा शोध घेतायत.

पोलिसांनी केलेल्या तपासात पुढे आलेल्या माहितीनुसार, गौरव आहुजा आणि त्याचे वडील मनोज आहुजा या दोघांची पार्श्वभुमी गुन्हेगारी स्वरुपाची आहे. त्यातूनच गौरव आहुजावर जुगार आणि अपहरणाचा गुन्हा पुण्यातील विमानतळ पोलीस ठाण्यात २०२१ ला दाखल करण्यात आलाय. गौरव आहुजा हा त्यावेळी अवघ्या २० वर्षांचा होता. मात्र क्रिकेटवर बेटींग घेणार्या टोळीचा तो सदस्य होता. पुण्यातील नामचीन गुंड सचिन पोटेच्या नेतृत्वात ही टोळी क्रिकेट सामन्यांवर बेटींग घेत होती. कॉलेजमध्ये शिकणारे तरुण ही टोळी बेटींगच्या सापळ्यात ओढत असे. बेटींगच्या व्यसनामुळे अनेक कॉलेज तरुण कर्जबाजारी बनले होते. कर्ज फेडण्यासाठी या टोळीने त्या कॉलेज तरुणांना स्वतःच्या घरात चोरी करायला भाग पाडण्यात येत होतं. जे कॉलेज तरुण पैसे देत नव्हते त्यांच अपहरण करण्यात येत होतं. एका विद्यार्थ्याच्या तक्रारीनंतर पुणे पोलीसांच्या गुन्हे शाखेने गुन्हा नोंदवला असल्याची ही माहिती पुढे आली आहे.

# पुणे शहरात 'महाबोधी विहार मुक्ती' साठी बौध्द समाजाचे तीव्र आंदोलन

पुणे । प्रतिनिधी

बोधगया येथील ब्राह्मणाच्या ताब्यात असलेले महाबोधी विहार हे मुक्त करून ते बौध्दांच्या ताब्यात द्या अशी मागणी पुढे येत आहे. बिहार राज्यातील पाटना बोधगया येथील महाबोधी विहारात गेले अनेक वर्ष झाले ब्राह्मण व्यवस्थापन आहे. ब्राह्मणाच्या ताब्यात असलेले महाबोधी विहार हे मुक्त करून ते बौध्दांच्या ताब्यात द्या, यासाठी देशभर भन्तेजींच्या नेतृत्वात महाविहार मुक्तीसाठी आंदोलने सुरु आहेत. आज पुण्यात देखील महाबोधी विहार मुक्तीसाठी आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते तसेच, बौध्द समाज बांधवांनी मोठा मोर्चा काढून महाविहार मुक्तीसाठी आंदोलन करण्यात आले. महाबोधी विहार मुक्ती कृती समितीच्या वतीने तसेच समस्त भन्ते यांच्या नेतृत्वात आंदोलनास सुरुवात करण्यात आली.




बुध्दम शरणम गच्छामी' अशा सुरात शिवाजीनगर येथील बालगंधर्व रंगमंदिर चौकापासून आंदोलानास सुरुवात करण्यात आली. रथात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व तथागत भगवान गौतम बुद्ध यांची मुर्ती ठेवून हातात पंचशील ध्वज, अंगात पांढरे वस्त्र परिधान करून महिला व पुरुष आंदोलनात हजारोंच्या संख्येने सहभागी झाले होते. महाबोधी विहार मुक्तीसाठी यावेळी घोषणाबाजी करण्यात आली. हातात विविध मागण्या असलेले फलक दिसत होते. फलकावर चलो एक साथ, चलो बुद्ध की ओर, महाबोधी विहार मुक्त ब्राह्मण व्यवस्थेतून मुक्त झालेच पाहिजे, बौध्दांना स्वतःचा महाबोधी विहार व्यवस्थापन हक्क मिळलाच पाहिजे, सन १९४९ चा महाबोधी विहार व्यवस्थापन कायदा रद्द झालाच पाहिजे, बौध्दांना स्वनिर्णयाचा हक्क मिळलाच पाहिजे, महाबोधी विहार बौध्दांच्या ताब्यात दिलेच पाहिजे आशा आशयाचे फलक हाती घेऊन महाबोधी विहार मुक्ती कृती समितीचे पदाधिकारी, आंबेडकरी बौद्ध समाजाकडून रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी महाबोधी विहार मुक्त कृती समितीचे शैलेंद्र चव्हाण, परशुराम वाडेकर, संजय सोनवणे, डॉ.सिद्धार्थ धेंडे, अशोक कांबळे, जयदेव गायकवाड, अविनाश साळवे, वसंत साळवे, भन्ते अनेक मान्यवर, सदस्य सहभागी झाले होते. मोर्चा बालगंधर्व, जंगली महाराज रस्ता, संभाजी पुतळा ते अल्का टॉकीज चौकापर्यंत गेला. चौकात प्रमुख नेते, भन्ते यांची भाषणे झाली आणि आंदोलनाचा शेवट करण्यात आला.

cmyk